दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -३०१ शनिवार, दि.०५ जुलै २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-301 Saturday, Dt.05 July 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# १९ वर्षांनंतर ठाकरे बंधू शनिवारी एका व्यासपीठावर

## मराठी विजय मेळाव्याद्वारे शक्तिप्रदर्शन, नव्या समीकरणाकडे लक्ष

मुंबई : प्रतिनिधी

हिंदी सक्तीबाबत सरकारला माघार घ्यायला भाग पाडल्यानंतर ५ जुलैला काढण्यात येणा-या मोर्चाऐवजी उद्या मराठी विजय मेळावा होत असून, मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेनेच्या ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे १९ वर्षानंतर राजकीय व्यासपीठावर एकत्र येत असल्याने या मेळाव्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या मेळाव्याद्वारे जोरदार शक्तिप्रदर्शन करून याची चुणूक दाखवण्यात येणार आहे.

मुंबईतील वरळी डोम येथे शनिवारी ठाकरेंची शिवसेना आणि मनसे यांचा भव्य एकत्रित मेळावा होणार आहे. सकाळी ११.३० वाजता राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे डोम ला पोहोचतील. या विजयी रॅलीत प्रकाश रेड्डी, जयंत पाटील (शेकाप), सुप्रिया सुळे, राज ठाकरे, उद्धव ठाकरे अशी भाषणे होणार आहेत. जर काँग्रेसचे नेते आले तर त्यांनाही भाषण करण्याची संधी दिली जाणार आहे. शेवटचे भाषण उद्धव ठाकरे यांचे असणार आहे.

त्रिभाषा सूत्रानुसार राज्यात पहिलीपासून हिंदी विषय अनिवार्य करण्याच्या राज्य सरकारच्या



निर्णयाविरुद्ध महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली होती. त्यावेळी राज ठाकरे यांनी याला कडाडून विरोध करीत याविरोधात ५ जुलैला मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनीही यात सहभागी होण्याची घोषणा केली होती; परंतु त्या आधीच सरकारने हा निर्णय मागे घेतल्याने मोर्चा रद्द करण्यात आला आणि त्यानंतर मोर्चाऐवजी विजयी मेळावा घेण्याचे ठरले. त्यानुसार वरळीत या मेळाव्याची जोरदार तयारी करण्यात आली असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधूंचे शक्तिप्रदर्शन होणार आहे.

या मेळाव्याच्या निमित्ताने जोरदार शक्तिप्रदर्शन करण्याची तयारी केली आहे. मनसे-शिवसेना ठाकरे गटाने वरळी डोम परिसरात मोठ्या प्रमाणात बॅनरबाजी करण्यात केली आहे. या बॅनरवर राज ठाकरे, उद्धव ठाकरे यांच्या सोबत बाळासाहेब ठाकरे यांचे एकत्र फोटो पहायला मिळत आहेत. आम्ही गिरगावकर या संघटनेकडून 'जी मराठी लोक चुकीची रिक्षा पकडून नागपूरला गेले आहेत, त्यांनी परत मुंबईत ठाकरे बंधूकडे या नाही तर कायमचे गुजरातला पोहोचाल

# शिंदेंचा जय गुजरातचा नारा, राजकारण तापले

पुणे/मुंबई : प्रतिनिधी

पुण्यातील कोंढवा कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आज आयोजित कार्यक्रमात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेहमीप्रमाणे अमित शाह यांचे भरभरून कौतुक केले. मात्र, भाषणाच्या शेवटी शिंदेंनी जय हिंद, जय महाराष्ट्र, असे म्हणत भाषण संपविले. परंतु काही क्षणांतच जय गुजरातचा नारा दिला. त्यांच्या या वक्तव्यावरून राजकारण चांगलेच तापले असून, विरोधकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठविली. त्यानंतर खुद्द शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन यासंबंधीचा खुलासा केला. तथापि, या वक्तव्यावरून शिंदेंची सेना बॅकफूटवर गेल्याचे बोलले जात आहे.

सध्या मराठी अस्मितेचा मुद्दा ऐरणीवर असताना शिंदे यांच्या विधानावरून मोठा राजकीय वाद निर्माण झाला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घोषणेवरून शिवसेना ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत, आदित्य ठाकरे, उपनेत्या सुषमा अंधारे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी त्यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.

अंधारे यांनी मला यात काही आश्चर्य वाटत नाही. कारण महाराष्ट्रद्रोही निर्णय घेऊन महाराष्ट्राच्या अस्मिता दिल्लीश्वरांच्या पायथ्याशी वाहिल्यानंतर त्यांना मुख्यमंत्रीपदाचे बक्षीस मिळाले आहे.त्यामुळे आपण सगळ्यात



अतिउत्तम लाचार कसे, हे दाखवण्याची स्पर्धा सुरू झालेली आहे. ज्या पद्धतीने अजित पवारांनी सर्व ताब्यात घेतले आहे आणि एका अर्थाने शिंदे हे ब-यापैकी वेगळे झालेले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा प्रवाहात येण्याचा प्रयत्न करण्यासाठी त्यांना हे सगळे बोलणे गरजेचे आहे, असे म्हटले.

विरोधकांनी हल्लाबोल केल्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन खुलासा केला. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांनीही जय गुजरात म्हटल्याचा व्हीडीओ दाखविला. तसेच गुजरात हा काय पाकिस्तान नाही. गुजरातींच्या कार्यक्रमाला गेल्यावर जय गुजरात म्हटले तर वावगे काय, असा सवाल करीत जय गुजरातचे समर्थन केले.

## वैयक्तिक जागांमधील कांदळवनांच्या संरक्षणासाठी

# 'कार्बन क्रेडिट' देण्याबाबत शासन सकारात्मक- पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

**मुंबई (प्रतिनिधी)**
**समुद्रकिनारी असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये अथवा वैयक्तिक जागेत कांदळवन आहेत. या कांदळवनांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना ताकद दिली जाईल. अशा जागांमधील कांदळवनांच्या संरक्षणाकरिता ' कार्बन क्रेडिट'**

देण्याबाबत शासनाकडून सकारात्मक पावले उचलण्यात येतील, असे पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

पालघर जिल्ह्यातील कांदाळवनांच्या अतिक्रमणाबाबत सदस्य स्नेहा दुबे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य मनीषा चौधरी, संजय केळकर , राजेंद्र गावित यांनीही सहभाग घेतला.

या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, कांदळवनांवर अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात कडक कायदेशीर कारवाई केली जाईल. कांदळवनांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी वन विभागाकडे ' मॅग्रोव्ह सेल ' कार्यरत आहे. या सेलच्या माध्यमातून कांदळवन संवर्धनाचे काम होत आहे. महाराष्ट्राच्या समुद्रकिनारी असलेल्या कांदळवनांचे ऱ्हास करून पर्यावरणाचा असमतोल निर्माण करणाऱ्या घटकांवर निश्चितच कारवाई केली जाईल. अशा १९ प्रकरणात गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत, अशी माहितीही पर्यावरण मंत्री श्रीमती मुंडे यांनी दिली.

## खा.बजरंग सोनवणेंच्या वाढदिवसानिमीत्त

# बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची होणार आरोग्य तपासणी

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम,जिल्हा शल्य चिकित्सक यांचे वैद्यकिय अधिक्षकांना पत्र

बीड/प्रतिनिधी

बीडचे खा.बजरंग सोनवणे यांचा वाढदिवस दि.६ जुलै रोजी जिल्हाभरात विविध कार्यक्रमांनी साजरा केला जात आहे तालुकास्तरावर राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने रक्तदान शिबीरांचे आयोजन केले आहे. दरम्यान,राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी ते बारावी पर्यंत विद्यार्थ्यांचीमोफत आरोग्य तपासणी केली जाणार आहे. खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसा निमित्त बीड जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गतमोफत आरोग्य तपासणी



शिबीराचे आयोजन करण्याबाबत डॉ.संजय राऊत,जिल्हा शल्य चिकीत्सक,जिल्हा रूग्णालय बीड यांनी सर्व वैद्यकिय अधिक्षकांना याबाबत पत्र दिले आहे.राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करयात येते.यामध्ये ० ते ६ वर्षे

(उर्वरीत पान २ वर)

# पाटोदा तालुका खरेदी विक्री संघाची निवडणूक बिनविरोध आमदार सुरेश धस गटाचा बोलबाला

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा तालुका खरेदी विक्री संघाची निवडणूक यंदा बिनविरोध पार पडली असून, आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वाखालील गटाने या निवडणुकीत बाजी मारली आहे. एकूण १७ जागांसाठी झालेल्या या निवडणुकीत आमदार सुरेश धस गटाने ९ जागांवर विजय मिळवत स्पष्ट वर्चस्व सिद्ध केले आहे.तर बांगर गटाला ५ जागा व माजी आमदार भीमराव धोंडे गटाला केवळ ३ जागांवर समाधान मानावे लागले. बिनविरोध निवडणूक झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर मतगणनेची गरज भासली नाही, मात्र या निकालांमुळे पाटोदा तालुक्यात पुन्हा एकदा आमदार सुरेश धस



यांची राजकीय पकड अधोरेखित झाली आहे.निवडणुकीत कोणताही गहजब किंवा अनुचित प्रकार न घडता शांततेत संपूर्ण प्रक्रिया पार पडली. यामुळे तालुक्यातील शेतकरी व सहकारी क्षेत्रातील कार्यकर्त्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.



# महिला व बालविकास विभागाचा तुघलकी कारभार

**जिथं शाळांनाच ईमारती नाहीत तिथे म्हणे अंगणवाडीचे शाळेत स्थलांतर करा – डॉ.गणेश ढवळे**

बीड ।प्रतिनिधी

ज्या अंगणवाडी केंद्राना स्वतःची इमारत उपलब्ध नाही अशी अंगणवाडी केंद्रे नजीकच्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये स्थलांतरित करण्याबाबत महिला व बालविकास विभागाने दि.२ जुलै रोजी अध्यादेश काढला आहे.परंतु अध्यादेश काढण्यापुर्वी जिल्हा परिषदेच्या शाळांना तरी पुरेशा इमारती आहेत का ? सुस्थितीत आहेत का ? सुरक्षित आहेत का ? याचा विचार केलेला नाही.

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या धोकादायक

(उर्वरीत पान २ वर)

# पशुधनाचे आरोग्य जपत बेबळ्याची वाडीत पशु लसीकरण महामोहीम संपन्न

बदनापूर।प्रतिनिधी

बेबळ्याची वाडी, येथे दिनांक ३जुलै रोजी कृषी महाविद्यालय, बदनापूरच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केलेले पशु लसीकरण शिबिर नुकतेच यशस्वीरित्या पार पडले. ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम (ठ-थए) आणि कृषी औद्योगिक सलगता उपक्रम अंतर्गत आयोजित या शिबिरात परिसरातील अनेक पाळीव प्राणी आणि पशुधनाचे लसीकरण करण्यात आले, ज्यामुळे त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यास मोलाची मदत झाली.

या उपक्रमाच्या आयोजनात कृषी महाविद्यालय, बदनापूर




येथील विद्यार्थी आदित्य मापारी, पृथ्वीराज राठोड, प्रदीप सिंगल, अभिषेक वाघमारे, आणि चेतन साळवे यांनी सक्रिय सहभाग घेतला. पशुधन आणि पाळीव प्राण्यांना विविध रोगांपासून वाचवण्यासाठी लसीकरण किती महत्त्वाचे आहे, यावर या शिबिरात विशेष भर देण्यात आला. विशेषतः, अलीकडील काळात लंपी स्किन रोग सारख्या आजारांनी पशुधनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे, अशा परिस्थितीत लसीकरणाचे महत्त्व अधोरेखित झाले.

(उर्वरीत पान २ वर)

# पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या कारवाईत मोठ्या प्रमाणात देशी दारु जप्त

बीड /प्रतिनिधी

दिनांक ०३ जुलै २०२५ रोजी पोलीस स्टेशन पिंपळनेर हद्दीत मोठ्या प्रमाणावर देशी दारूची चोरटी वाहतूक उघडकीस आली. पोलीस उपनिरीक्षक गोलवाल यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे चिंचोली गावाजवळ नाळवंडी ते बीड रोडवर स्विफ्ट वाहनातून बेकायदेशीर देशी दारूची वाहतूक केली जात असल्याचे समजले. सदर माहितीच्या आधारे सपोनि मधुसुदन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पार्टीने पंचासमक्ष छापा टाकून कारवाई केली.पोलिसांच्या या धाडसी




कारवाईमध्ये हनुमान खंडेराव गायके (वय ३१ वर्ष), सचिन विठ्ठल वादे (वय ३५ वर्ष) दोघेही रा. नाळवंडी, जि. बीड, आणि बळीराम खंडेराव गायके (रा. नाळवंडी) हा स्कूटी सोडून पळून गेला. आरोपींकडून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल असा की,देशी दारु (बॉबी संत्रा) एकूण १,५४४ बाटल्या (किंमतः ६६,०८०/-) चारचाकी स्विफ्ट गाडी (MH47N5627) - ५,००,०००/-टी.व्ही.एस. स्कुटी (MH23BM4836) १,००,०००/-

(उर्वरीत पान २ वर)

# स्थानिक गुन्हे शाखा एएचटीयु यांचा संयुक्तपणे शिवाजीनगर पोलीस स्टेशन हद्दीत वैश्या व्यवसायावर छापा

बीड /प्रतिनिधी

दिनांक ०३/०७/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड येथे गुप्त बातमीदार मार्फत बातमी मिळाली की, पोलीस ठाणे शिवाजी नगर हद्दीत भगवान विद्यालयाचे मागील बाजूला, तक्षशिला नगर, धानोरा रोड बीड, येथे दोन महिला बाहेरून महिला बोलावून वेश्या व्यवसाय करीत असल्याची माहिती मिळाल्याने सदरची माहिती वरीष्ठांना दिली. त्यावरून वरीष्ठांनी शिवाजी धोंडीबा बंटेवाड, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा. यांना सदर ठिकाणी छापा टाकण्याचे लेखी आदेश दिले.

त्यावरून शिवाजी धोंडीबा बंटेवाड, पोलीस निरीक्षक, तसेच अ.मा.वा.प्र. कक्ष बीड येथील स्टाफ यांनी डमी ग्राहक



व पंचासह सदर ठिकाणी सापळा रचून डमी ग्राहकास सदर ठिकणी पाठवुन खात्री केली असता तेथे असलेल्या महीला एजंट ने वेश्या गमनासाठी होकार देवून त्यासाठी १५००/- रुपयांची मागणी केली. डमी ग्राहक याने ठरल्याप्रमाणे रक्कम देवून पोलीस पथकास इशारा केला असता पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा मारला. पैसे स्विकारलेल्या महिलेला तिचे नाव गाव विचारले असता तिने तिचे नाव आशा पंडित गायकवाड वय ४५ वर्षे रा. मोतीमहल, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड ह.मु. तक्षशिला नगर, धानोरा रोड बीड असे सांगितले. सदर महिलेची झडती घेतली असता डमी ग्राहकाने दिलेल्या नमुद वर्णनाच्या

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# संत वामनभाऊ महाराजांच्या दिंडीला माजी आ.भीमराव धोंडे यांची महापंगत

## हजारो भाविक भक्त आणि वारकऱ्यांनी दिले आशीर्वाद;धोंडेंनी वारकऱ्यांचे घेतले दर्शन!



आष्टी (प्रतिनिधी)

गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने दरवर्षी पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी दिंडी सोहळ्याची परंपरा आहे. या पायी दिंडीतील वारकऱ्यांना माजी आ. भीमराव धोंडे यांच्यावतीने महापंग देण्याची परंपरा आहे. यंदाही माजी आ. भीमराव धोंडे यांच्यावतीने सबंध वारकरी बांधवांना मिस्टांनाची महापंगत देऊन भीमराव धोंडे यांनी सामाजिक कर्तव्य जपलेच किंबहुना सामान्य शेतकरी, शेतमजूर वारकऱ्यांच्या पायी नतमस्तक होऊन त्यांनी आशीर्वाद घेतले आणि साधेपणाची आपली परंपरा पुन्हा कायम ठेवली. शुक्रवार दि. ६ जुलै २०२५ रोजी अवघ्या महाराष्ट्राने देशाचा अत्यंत महत्त्वपूर्ण असलेला अध्यात्मिक केंद्रस्थान विठुरायाच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी लाखो वारकरी अत्यंत आनंदी आणि पवित्र मनाने नतमस्तक होण्यासाठी मार्गस्थ झालेले आहेत. गाव वाड्यावर आणि शहरामधूनही विविध जाती, धर्म, पंथांच्या पायी दिंडी जाऊ लागल्या आहेत. धार्मिक अधिष्ठान असलेले अनेक परिवार मनोभावे त्यांची नाश्ता, फळे, पाणी, आरोग्य सुविधा तसेच भोजन देऊन आपले कर्तव्य निभावतात. माजी आ. भीमराव धोंडे यांचे वडील कै. आनंदराव धोंडे (बाबाजी), चुलते, आजी हे धार्मिक वृत्तीचे होते. भक्त भाविक आणि वारकऱ्यांची मनोभावे सेवा करणे हे त्यांनी आयुष्यभर जपले. त्यानंतर हे धोंडे परिवाराची परंपरा माजी आ. भीमराव धोंडे यांच्यावतीने पार पाडली जाते. आज शुक्रवारी या दिंडी सोहळ्यातील वारकऱ्यांना मिस्टांनाची महापंगत देऊन माजी आ. भीमराव धोंडे यांनी राजकीय नेते असतानाही महाराज व वारक-यांसोबत बसून त्यांनी हा पवित्र प्रसाद ही मनोभावे सेवन केला.

यावेळी माजी आ. भीमराव धोंडे, डा. अजयदादा धोंडे, अभयराजे धोंडे, जयंत राख, राजेंद्र धोंडे, रामराव खेडकर, रामदास बडे, सभापती सौ. सुवर्णाताई लांबरुड, रत्नदीप निकाळजे, प्रा. शिवदास विधाते, बाळासाहेब शेकडे, इंजि. एम. एन. बडे, महारुद्र खेडकर, रमेश सिरसाट, भागवत वारे, बाळासाहेब शेकडे, उत्तम बोडखे, नईम शेख, रघुनाथ शिंदे, विठ्ठलराव लांडगे, हरिभाऊ जंजीरे, प्रा. डा. बाळासाहेब धोंडे, सावळेराम जायभाये, हरि बोडखे, सोनाजी गांजुरे, माजी उपसभापती जालींदर सानप, बाबासाहेब ससाणे, बबनराव सांगळे, भाऊसाहेब लटपटे, ज्ञानदेव केदार, ह. भ. प. आसाराम बडे महाराज, गहिनीनाथ खेडकर महाराज, आजिनाथ लाड महाराज, रामशास्त्री वनवे महाराज, शिवाजी वनवे महाराज, विष्णु महाराज वनवे, संजय शेंडे आदि मान्यवर उपस्थित होते.

पंढरपूरजवळ संत वामनभाऊ दिंडीला महापंगत संत वामनभाऊंच्या लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र पंढरीच्या वाटेवर अत्यंत पवित्र मनाने तल्लीन होऊन मार्गस्थ असतानाच दरवर्षीप्रमाणे यंदाही २५ व्या. वर्षी माजी आ. भीमराव धोंडे यांनी पंढरपूरजवळ संत वामनभाऊ दिंडीला महापंगत दिली. या पालखी सोहळ्यात धोंडे हे परवा ५ कि. मि. अंतर पायी चालले. आज शुक्रवार दि. ४ जुलै रोजी महापंगत दिली. अध्यात्म परंपरेमध्ये भीमराव धोंडे घराण्याची वारीची सेवा करण्याची परंपरा माजी आ. भीमराव धोंडे यांनी सातत्याने जपली आहे. महाराष्ट्राच्या संत परंपरेने पावन अशा भूमित पंढरीच्या वारकऱ्यांना स्नेहभोजन देऊन कर्तव्य निभावण्याची कर्तव्य भावना अत्यंत पवित्र मनाने गेल्या २५ वर्षापासून माजी आ. भीमराव धोंडे यांनी जपली आहे. महाराष्ट्रातील संतांनी सांगितलेला समता, बंधुत्व, ऐक्याचा संदेश यापुढेही आपण जतन करू. संतांचा समतेचा संदेश पुढे नेऊ असे सांगत अत्यंत पवित्र, उत्साही आणि भक्तीमय वातावरणात संत वामनभाऊंचा पालखी सोहळा अशी पावित्र्यपूर्ण भावनिक साद माजी आ. भीमराव धोंडे यांनी दिली. श्रीक्षेत्र गहिनीनाथगडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज गहिनीनाथकर यांच्या नेतृत्वाखाली गहिनीनाथगड ते पंढरपूर असा पायी दिंडी पालखी सोहळा आज शुक्रवार दि. ४ जुलै रोजी पंढरपूरजवळ असलेल्या पखालपूर गणपती मंदीर येथे दुपारी २ वा. पोहचली. येथे परंपरेप्रमाणे माजी आ. भीमराव धोंडे यांच्यावतीने ५० हजार वारक-यांना भोजन दिले. यावेळी श्रीक्षेत्र गहिनीनाथगडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज यांच्या उपस्थितीमध्ये वारकऱ्याशी संवाद साधताना ते बोलत होते. शेकडो वर्षापूर्वी संत वामनभाऊ महाराज यांनी या पालखी सोहळ्याची सुरुवात केली होती. अहिल्यानगरसह मराठवाड्यातील वारकरी संत वामनभाऊ महाराज यांच्या दिंडीत सहभागीहोतात

## संपादकीय

# कुपोषणाचा विळखा

कोणत्याही समस्येकडे कानाडोळा केला, तर त्या समस्येचा भस्मासूर होण्यास फारसा वेळ लागत नाही. जोपर्यंत समस्येचा आपणास त्रास जाणवत नाही, समस्या आपल्या घराच्या उंबरठ्यापर्यंत येत नाही, समस्येमुळे आपली व्यक्तिगत हानी होत नाही, तोपर्यंत आपण जागे होत नाही. समस्या निवारणासाठी प्रयत्न केले जातात.

समस्येच्या गांभीर्याबाबत टाहो फोडला जातो. हीच आजवर आपल्या देशातील प्रत्येकाची मानसिकता आहे. राज्यात कुपाषणाची आकडेवारी जाहीर होताच अनेकांची झोप उडाली आहे. त्याला निमित्तही तसेच घडले आहे. कुपोषणाची समस्या म्हटल्यावर प्रत्येकाच्या नजरेसमोर आजवर मेळघाट अथवा आदिवासी पाडे यायचे. अगदी गुगलवर कुपोषण म्हटल्यावर मेळघाट परिसरातीलच फोटो पाहावयास मिळतात. वेळीच कुपोषण समस्येवर तोडगा काढला असता, या समस्येचे गांभीर्य जाणून समस्येचे समूळ निवारण करण्यासाठी प्रयत्न केले गेले असते, तर कदाचित आज या समस्येचा भस्मासूर फोफावणे शक्यच झाले नसते.

राजकीय चर्चा, राजकीय वाद, राजकीय घडामोडी याशिवाय आपले देशातील, राज्यातील, स्थानिक स्वराज्य संस्थामधील समस्यांकडे आपले लक्ष वेधले जात नाही. कुपोषण समस्या आजही मेळघाटापुरती, आदिवासी पाड्यांपुरतीच सीमित राहिली असती, तर कोणी कुपोषणाबाबत फारशी चर्चाही केली नसती, पण आज कुपोषणाच्या समस्येने मेळघाटाचे दरवाजे ओलांडून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत शिरकाव केला आहे. ग्रामीण भागातच नाही तर शहरी भागातही या आजाराने आपले अस्तित्व दाखविण्यास सुरुवात केली आहे.

महाराष्ट्राची राजधानी असणारी मुंबई नगरीदेखील कुपोषणाच्या विळख्यात अडकली आहे. राज्यात कुपोषणाचे सर्वाधिक रुग्ण हे मुंबईत असल्याचे कागदोपत्री उघडकीस आल्यावर अनेकांच्या झोपा उडाल्या आहेत. अर्थात कुपोषणाचा उद्रेक हे आरोग्य यंत्रणेचे अपयश आहे. प्रशासकीय यंत्रणांनी कुपोषणाचे गांभीर्य न जाणल्याने आज कुपोषणाच्या समस्येचा उद्रेक झालेला आहे. कुपोषणाच्या वाढत्या प्रमाणाची कबुली खुद्द विधिमंडळाच्या अधिवेशनामध्ये राज्य सरकारकडून देण्यात आली आहे.

राज्यात १ लाख ८२ हजार ४४३ कुपोषित बालके आढळली असून त्यापैकी ३० हजार ८०० बालके गंभीर तीव्र कुपोषणाच्या श्रेणीत असून १ लाख ५१ हजार ६४३ बालके मध्यम कुपोषित श्रेणीत असल्याची धक्कादायक माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत तारांकित प्रश्नांच्या लेखी उत्तरात दिली आहे. राज्यात सर्वाधिक २ हजार ७७८ तीव्र कुपोषित बालके मुंबई उपनगरात आढळून आल्याचे तटकरे यांनी उत्तरात नमूद केले आहे. नाशिक जिल्ह्यात ८ हजार ९४४ मध्यम कुपोषित, तर १ हजार ८५२ तीव्र कुपोषित बालके आढळून आली आहेत. धुळे जिल्ह्यात ६ हजार ३७७ मध्यम कुपोषित, तर १ हजार ७४१ बालके तीव्र कुपोषित आहेत.कुपोषणाची समस्या भारतासारख्या विकसनशील देशाला भूषणावह बाब नसून यावर आता केंद्र सरकार, त्या-त्या राज्य सरकारांना एकत्रितपणे गांभीर्याने विचार करावाच लागणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बालकांच्या कुपोषणाच्या गंभीर समस्येला देश तोंड देत आहे. देशाची भावी पिढी सशक्त, सुदृढ असणे देशाच्या पुढच्या भविष्यासाठी महत्त्वाचे आहे. त्यासाठी लहान वयातच मुलांना चांगला सकस व पोषक आहार मिळणे आवश्यक आहे.

### टीसी हरवला आहे

निखिल विलास कोरडे या नावाचा १० वी पास चा टी सी जरूड ते बीड प्रवास दरम्यान हरवला आहे. सापडल्यास संपर्क
मो नं ९१७२५५३३११

## नंदकुमार शिंदे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन

गेवराई ।प्रतिनिधी

पत्रकार दिनकर शिंदे यांचे ज्येष्ठ बंधू नंदकुमार शिंदे वय ५२ वर्षे यांचे पुणे येथील डी वाय पाटील हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असताना हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने



दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी सरोज, मुलगा रोशन यांच्यासह वडील सेवानिवृत्त मुख्याध्यापक टी डी शिंदे, आई शकुंतला, भाऊ डॉक्टर दीपक शिंदे, पत्रकार दिनकर शिंदे, बहीण अनिता आदी परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर गेवराई येथील चिंतेश्वर स्मशानभूमी येथे सकाळी दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. शिंदे कुटुंबीयावर कोसळलेल्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

## गुणवंत विद्यार्थ्यांनी संस्कारीत व्हावे,नवीन अभ्यासक्रमाचे आव्हान स्वीकारावे - डॉ.विलासराव सोनवणे

आष्टी (प्रतिनिधी)

दहावी आणि बारावी या महत्त्वाच्या परीक्षेमध्ये आपण यश प्राप्त करून गुणवंत, यशवंत झाला आहात. त्यामुळे तुम्ही संस्कारीत होण्याची आवश्यकता आहे आणि आगामी अभ्यासक्रम हा अत्यंत आव्हानात्मक असल्यामुळे त्यासाठी सज्ज व्हावे असे आवाहन आष्टी नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन डॉ. विलासराव सोनवणे यांनी केले. आष्टी नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने रविवार दि. २९ जुन रोजी आयोजित करण्यात आलेल्या गुणवंतांच्या सत्कार कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून डॉ. विलास सोनवणे बोलत होते.



यावेळी माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे, पोलिस उपनिरीक्षक श्रीकृष्ण शिंदे, पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन नवनीत कटारिया, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, सौ. निर्मला सोनवणे, सौ. विद्या चव्हाण, दादासाहेब खाडे, स्वानंद थोरवे, पतसंस्थेचे कार्यकारी संचालक काकासाहेब पोकळे आदि मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. विलासराव सोनवणे म्हणाले की, आपण सर्व ग्रामीण भागातील आणि सर्वसाधारण कुटुंबातील विद्यार्थी असून आई - वडिलांनी अत्यंत कष्ट करून आपणांस शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करत आहेत. आपण जे यश प्राप्त केले आहे ते उत्कृष्ट असून आगामी काळात जो अभ्यासक्रम आपणासमोर येणार आहे तो अत्यंत आव्हानात्मक आहे असे सांगताना ते म्हणाले की, माझी नात सातव्या इयत्तेत आहे. मी तिचा अभ्यासक्रम काय आहे ? हे पाहिल्यानंतर माझे असे लक्षात आले की, हा अभ्यासक्रम मला पदवी परीक्षेच्या पहिल्या वर्षी होता. मी ५० वर्षांपूर्वीचा एमबीबीएसचा विद्यार्थी असल्यामुळे मला या दोन्ही अभ्यासक्रमा विषयी कळते. याचाच अर्थ असा की, आज अत्यंत आव्हानात्मक अशी परिस्थिती निर्माण झालेली असून विद्यार्थ्यांना अभ्यास करूनच स्पर्धात्मक परीक्षा आणि इतर परीक्षेमध्ये यश प्राप्त करावे लागणार आहे. जो अभ्यास करतो त्याला काहीच अडचण नाही. त्याला कोणी रोखू शकत नाही. त्यामुळे यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर राहावे कारण आपण संस्कारीत आई - वडिलांचे मुले आहोत, त्यांच्या कष्टाकडे पाहूनच आपण अभ्यास करावा आणि भविष्यात मोठे यश संपादन करावे. गुणवंताचा सत्कार करण्यामागे इतर विद्यार्थ्यांनी त्यांच्यापासून प्रेरणा घ्यावी या उद्देशाने या सत्कार समारंभाचे आयोजन केले असून गोरगरीब विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी त्यांना पुस्तके आणि शालेय साहित्य यांचे वाटप पतसंस्थेतर्फे वेळोवेळी केलेले आहे. पतसंस्थेच्या सभासदांच्या यशस्वी पाल्यांचे सत्कार समारंभ पतसंस्थेतर्फे नेहमी आयोजित करण्यात येतात. पतसंस्था सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असते असे सांगितले.

यावेळी अनंत बाबासाहेब घुमरे, सार्थक स्वानंद थोरवे, कु. उत्कर्षा बाबासाहेब नाकाडे, अविष्कार संजय दहातोंडे, आदित्य रामदास कोल्हे, कु. अंकिता प्रविण धस, कु. आदिती सुरेश बोडखे, अक्षय एकनाथ ढोबळे, यश अशोक कराळे, भगत हरीश कैलास, कु. अपेक्षा माणिक पठाडे, ओंकार सूर्यकांत शिंदे, कु. प्रणिती कैलास पवार, प्रेरणा भाऊसाहेब कवळे, ओंकार संजय कचरे, ओंकार बबन कोल्हे, सार्थक संजय वर्धमाने, कु. प्रज्ञा संतोष डोके, रोहित संजय नेटके, सार्थक श्रीराम भवर, अनिकेत रावसाहेब भोजने यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ. सोनवणे म्हणाले की, स्पर्धेच्या युगात शिक्षण घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक खर्च पालकांना सोसावा लागतो. इतक्या मोठ्या प्रमाणावर खर्च असतांना आपले आईवडील कोणत्या परिस्थितीतून जातात याची विद्यार्थ्यांनी जाणीव ठेवावी. पुढे बोलतांना डॉ. सोनवणे म्हणाले, सध्याच्या काळात अभ्यासक्रमामध्ये खुप बदल झाला आहे. स्पर्धेच्या युगात आपण आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी स्पर्धा वाढली आहे. विद्यार्थ्यांनी आपली परिस्थितीची जाण लक्षात ठेवली पाहिजे त्यासाठी व्यासनाधिन न होता निर्व्यसनी राहणे गरजेचे आहे. जर आपण आपले सगळे लक्ष आपल्या भविष्याकडे दिले आणि परिस्थितीची जाणिव ठेवली तर यश नक्कीच मिळते असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वानंद थोरवे यांनी केले तर आभार संस्थेचे सचिव काकासाहेब पोकळे यांनी मानले.



बीड - वंचित बहुजन आघाडीचे बीड शहर अध्यक्ष लखन काका जोगदंड यांच्या वाढदिवसा निमित्त सत्कार करताना पत्रकार बालाजी जगतकर, संतोष जोगदंड, श्यामसुंदर जाधव, अरविंद इनकर, मिलिंद सरपते, योगेश गायकवाड, ओंकार सावंत आदी दिसत आहेत.




## पूरग्रस्त कॉलनीत आशेचे द्वार प्रतिष्ठानच्या वतीने गरजवंतांना छत्री वाटप

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील पूरग्रस्त कॉलनी येथे आशेचे द्वार प्रतिष्ठान संस्थेमार्फत ४ जुलै २०२५ रोजी गरजू लोकांसाठी छत्री वाटप करण्यात आली. या कार्याचा लाभ एकूण ३६ लोकांना झाला. या कार्यक्रमासाठी आशेचे द्वार प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष श्री जोसेफ सर, खजिनदार श्री प्रशांत खवडिया सर, सचिव सचिन जाधव सर, प्रोजेक्ट डायरेक्टर श्री प्रदीप लोंढे सर, तसेच संस्थेचे पर्यवेक्षक श्री विलास नवगिरे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, संस्थेचे स्वयंसेवक लक्ष्मण वार भवन यांच्या हस्ते छत्री वाटप करण्यात आले, या कार्यक्रमासाठी उपस्थित सामाजिक कार्यकर्ते निलेश घोरपडे, नारायण कांबळे, संदीप खंडागळे, गणेश गायकवाड, सुशांत (दादा) सतराळकर, आदित्य वारभुवन अर्जुन जोगदंड सिस्टर राणी रोकडे यांची उपस्थिती होती.

### पान १ वरून...

**स्थानिक गुन्हे शाखा एएचटीयु ...**

५००/- रूपये दराच्या तिन नोटा मिळून आल्याने पंचांसमक्ष जप्त केल्या. सदर ठिकाणी २ पिडीत महिला मिळून आल्या. पिडीत महिलांना विश्वासात घेवून चौकशी केली असता त्यांनी कळवले की, आशाबाई पंडित गायकवाड़ ही व तिची सहकारी कुशीवर्ता मोहन शिराळे रा. धानोरा, ता. जि.बीड यांनी पिडीत महिलांना बोलावून स्वतःचे आर्थिक फायदयासाठी ग्राहकांकडून पैसे घेवून पिडीत महिलांकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचे सांगीतले. आरोपी आशाबाई पंडित गायकवाड यांची दोन पंचासमक्ष झडती घेतली तिच्याकडे डमी ग्राहकाने दिलेल्या तिन नोटा मिळून आल्या. तसेच रुमची झडती घेतली असता णडढ-ऊ कंपनीचे १२ विना वापरलेले निरोध मिळून आले आहे.

आरोपी क्र १ आशाबाई पंडित गायकवाड वय ४० वर्षे रा. मोतीमहल, सुभाष रोड बीड, ता.जि.बीड ह.मु. तक्षशिला नगर, धानोरा रोड, बीड, ता. जि.बीड २. कुशीवर्ता मोहन शिराळे वय ४५ वर्षे राधानोरा रोड, ता.जि.बीड असे दोघींनी वर नमूद पिडीत महिलांना स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी तिला बोलावून स्वतःचे ताब्यातील जागेचा वापर करून, त्याच कमाईवर उदरनिर्वाह करून वेश्याव्यवसाय करण्यास लावले व सदर महिलांचे शोषण करण्याचे उद्देशाने बोलावले म्हणून त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे अनौतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५,६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आहे. तसेच दोन पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर उपविभागीय पोलीस अधिकारी कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी धोंडीबा बंटेवाड, पोलीस निरीक्षक, पोउपनि मुरकुटे पोह/ १६२६ शिंदे पोशि/ २२१० अशपाक, पोशि/२२१५ परझणे) स्था. गु शाखा बीड, व पोउपनि पल्लवी जाधव, मपोह/९९७ उषा चौरे, मपोह/ ६८ शोभा जाधव, मसफौ/८४२ मिरा रेडेकर, पोह/२१५७ प्रदिप येवले, पोह/२४२ अशोक शिंदे, चालक पोशि/१९८२ योगेश निर्धार सर्व ने.अ.मा.वा.प्र. कक्ष बीड, यांनी केली.

**पिंपळनेर पोलीस ...**

दोन मोबाईल फोन्स (Oppo कंपनी) ४०,०००/-एकूण किंमतः ७,०६,०८०/- .पोलिसांनी सदर देशी दारूचे नमुने पंचासमक्ष वेगळे काढून सीए प्रयोगशाळेसाठी राखून ठेवले आहेत. संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, आरोपींविरुद्ध महाराष्ट्र

दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (र), ६५ (श), ८१, ८२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि मधुसुदन घुगे, पो.उ.नि. गोलवाल, पो.अं. दीपक धोंडे चापोशि-२२७० चव्हाण, होमगार्ड-१९२६ झुगे, होमगार्ड-१९१५ पवार, होमगार्ड-१९१६ राठोड, होमगार्ड-१९४३ मुंजाळ, होमगार्ड १९४६ निरधार यांनी केली असून, पुढील तपास सुरू आहे.

**पशुधनाचे आरोग्य...**

परिसरातील अनेक पशुपालकांनी आणि ग्रामस्थांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

उपस्थिती आणि मार्गदर्शन

### पान १ वरून...

शिबिरात पशुवैद्यकीय डॉक्टर कर्डिले यांनी पशुधनाची तपासणी करून त्यांना आवश्यक असलेल्या लसी दिल्या. यात लाळ्या खुरकूत, आणि लंपी स्किन रोग प्रतिबंधक यांसारख्या महत्त्वाच्या लसींचा समावेश होता. या लसीकरणामुळे प्राण्यांमधील रोगांचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत झाली, ज्यामुळे शेतकऱ्यांचे आणि पशुपालकांचे संभाव्य आर्थिक नुकसान टाळता येईल.

यावेळी शेतकरी चंदनसिंग बहुरे, विठ्ठल बहुरे, इतर पशुपालक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या संपूर्ण उपक्रमासाठी कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. डी. के. पाटील, कार्यक्रम समन्वयक डॉ. एन. डी. देशमुख, आणि कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. जे सुपेकर,डॉ. एम.यु. तनपुरे यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच विद्यार्थ्यांनी हा महत्वपूर्ण उपक्रम यशस्वी करून दाखवला.

जनजागृतीला यश

या यशस्वी शिबिरामुळे बेबळ्याची वाडी येथील पशुधनाच्या आरोग्याविषयी जागरूकता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. 'ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम' आणि 'कृषी औद्योगिक सलगता उपक्रम' यांसारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात काम करण्याची संधी मिळते आणि समाजासाठी उपयुक्त असे कार्य ते करू शकतात हे या शिबिराने सिद्ध केले. भविष्यातही असेच उपक्रम राबवून ग्रामीण भागातील पशुधनाचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.यावेळी गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

**खा.बजरंग सोनवणेंच्या....**

वयोगटातील अंगणवाडीमध्ये जाणाऱ्या बालकांची वर्षातून २ वेळा तर शासकीय आणि निम शासकीय शाळांमधील ६ ते १८ वर्षे वयोगटा तील विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करण्यात येते. दरम्यान,दि.६ जुलैरोजी खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसा निमीत्त संपूर्ण बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुका स्तरावर विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीने वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे.त्यासाठी शिक्षण विभागाशी संपर्क करण्यात येत असून संबंधीत शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत जन जागृती करावी,असेही डॉ.संजय राऊत,जिल्हा शल्य चिकित्सकजिल्हा रुग्णालय,यांनी म्हटले आहे.दरम्यान,यासाठी तालुकास्तरावर नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. वैद्यकिय अधिक्षक,सर्व जिल्हा/उप जिल्हा/ ग्रामिण रुग्णालय यांना पत्र पाठवून आपल्या अधिनस्त आरबीएसके अंतर्गत सर्व वैद्यकिय पथकांना सज्ज ठेवून आरोग्य तपासणी करावी असे आदेश दिले आहेत.

**महिला व बालविकास...**

असुन त्याठिकाणी अध्यापन करू नये असे शिक्षण विभागाने कळविले असुन ७४९ वर्गखोल्यांची किरकोळ दुरुस्ती तर ८५६ वर्गखोल्यांना मोठ्या दुरुस्तीची गरज असल्याचे म्हटले आहे. जिल्हा परिषदेच्या मोडकळीस आलेल्या वर्गखोल्या तर काही ठिकाणी झाडाखाली, समाज मंदिर, चावडीत बसुन शिक्षण घेत आहेत.आता या आदेशामुळे शासनाचा तुघलकी कारभार समोर आल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली आहे.

# मुलगी पाहायला आले अन् लग्न लावून गेले युवराज शिंदे यांनी केला मुलाचा आदर्श विवाह

## पृथ्वीराज व श्रध्दा यांचा विवाह ठरला समाजासाठी प्रेरणादायी



वडवणी/प्रतिनिधी

वडवणी येथील महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे मराठवाडा अध्यक्ष युवराज शिंदे यांचे द्वितीय चिरंजीव पृथ्वीराज हे व त्यांचे कुटुंब मुलगी पाहण्यासाठी जालना जिल्ह्यातील कुंभारी पिंपळगाव येथे गेले व मुलगी पाहायला गेले अन् लग्न लावून आले.हा युवराज शिंदेंचा आदर्श पायंडा मुलाचा विवाह साधेपणात केल्याने समाजासाठी चांगला संदेश ठरला आहे.

युवराज शिंदे यांना तीन मुले आहेत वैभव, पृथ्वीराज व शंतनु प्रथम चिरंजीव वैभव याचा विवाह झालेला असून द्वितीय चिरंजीव पृथ्वीराज यांचा विवाह कुंभारी पिंपळगाव येथील दत्तात्रय सुरासे यांची चिं.सौ.कां.श्रद्धा सुरासे यांच्याशी दि.३०जुन सोमवार रोजी कुंभारी पिंपळगाव येथे साध्या पद्धतीत अन् मर्यादित नातेवाईका समवेत पार पडला.

युवराज शिंदे यांनी त्यांच्या मुलाचा प्रेरणादायी आणि आदर्श विवाह पार पडला. सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे युवराज शिंदे यांनी आपल्या मुलाचा विवाह अगदी साध्या,पारंपरिक आणि सामाजिकदृष्ट्या आदर्श पद्धतीने संपन्न केला.

विशेष बाब म्हणजे वरपक्ष फक्त मुलगी पाहण्यासाठी सुरासे कुटुंबीयांकडे आले होते. मात्र सुरासे परिवारातील साधेपणा,संस्कार, पारदर्शकता आणि माणुसकीच्या भावना पाहून वरपक्ष इतके प्रभावित झाले की, त्यांनी त्याच दिवशी विवाह लावून देण्याचा निर्णय घेतला.कुठलाही बडेजाव,खर्च किंवा दिखावा व मानपान न करता उपस्थित नातेवाईक आणि गावातील काही मान्यवरांच्या साक्षीने विवाह पार पडला.

यावेळी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे, शिवसेनेचे उपनेते लक्ष्मण वडले, महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे बीड जिल्हाध्यक्ष दिलीपराव झगडे ,महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे युवकाचे प्रदेशाध्यक्ष सुरेंद्र भैय्या कावरे, बळीराम वैद्य,वडवणी तालुका शिवसेना प्रमुख विनायक बप्पा मुळे,प्राचार्य राऊत डी.डी.पंचायत समितीचे सदस्य अंकुश आप्पा रोकडे,वडवणी रोजगार हमी योजनेचे माजी चेअरमन शिवाजी तौर,शाम राऊत,आशोकराव झगडे,धर्मराज शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

सध्या विवाह समारंभ म्हणजे खर्च धामधूम आणि दिखावा यासाठी ओळखले जात असताना युवराज शिंदे यांच्या या कृतीने समाजाला एक वेगळाच संदेश दिला आहे. समाजातील उथळ परंपरांना बाजूला ठेवत खरं माणूसपण जपणारा हा विवाह आज अनेकांसाठी आदर्श ठरला आहे.चि.पृथ्वीराज व चि.सौ.कां.श्रध्दा यांचा विवाह सोहळा आदर्श ठरला असून युवराज शिंदे यांची सामाजिक बांधिलकी पुन्हा सिद्ध झाली.



# धनगर पिंपरी येथील पंढरपूरला जाणाऱ्या यात्रेकरूंना प्राथमिक आरोग्य केंद्राकडून मोफत औषध वाटप

अंबड (प्रतिनिधी)

तालुक्यातील धनगर पिंपरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राकडून बसने पंढरपूरला आषाढी वारीसाठी निघालेल्या १४० वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी, धनगर पिंपरी येथील स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्राने आज दि ०४/०७/२०२५ रोजी मोफत औषध वाटप शिबिराचे आयोजन केले. या शिबिरात वारकऱ्यांना आवश्यक औषधे आणि आरोग्य विषयक सल्ला देण्यात आला.यावेळी बोलताना, प्राथमिक आरोग्य केंद्राचे. वैद्यकीय आरोग्य सेविका. प्रतिमा गंगाधरी . आरोग्य सेवक .सर्जेराव पावशे म्हणाले, वारीमध्ये मोठ्या संख्येने भाविक बसने प्रवास करत असल्याने त्यांना मळमळ व थकवा, सर्दी, खोकला, अंगदुखी यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर, वारकऱ्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी आम्ही हे औषध वाटप शिबिर आयोजित केले आहे.

या शिबिरामध्ये ताप, डोकेदुखी, अतिसार, जुलाब, त्वचेचे आजार आणि इतर सामान्य आजारांवर उपचार करण्यासाठी आवश्यक असलेली औषधे वाटण्यात आली. तसेच, आरोग्य कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व, पाणी उकळून पिणे आणि प्रवासात घ्यायची काळजी याबद्दल वारकऱ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून, या शिबिराला उपस्थित संजय (आबा) जाधव. संतोष मोढेकर .भागीरथ खांडेकर .प्रकाश ढवळे. सुनील खांडेकर. राजू माने . सोपान मोढेकर. सतीश खांडेकर. संतोष खांडेकर .रामेश्वर गोडसे. धनंजय मुळे . परमेश्वर आरगडे. रामेश्वर आरगडे. सोपान साळुंके. हनुमान खांडेकर. अशोक मुळे. वाल्मीक आधे. बबनराव जाधव. कैलास देवकर. ज्ञानेश्वर साळुंके ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# बीडमध्ये आषाढी एकादशीनिमित्त 'अभंगवाणी' भक्तिसंगीत कार्यक्रम



बीड (प्रतिनिधी)

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, बीड शाखा, बालरंगभूमी परिषद आणि सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (काकू) महाविद्यालयातील संगीत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीनिमित्त 'अभंगवाणी' हा भक्तिसंगीत गायन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती नाट्य परिषदेच्या अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी दिली.

हा कार्यक्रम आज (दि.५) सकाळी ११ वाजता सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या सभागृहात होणार आहे. यात बीड शहर आणि परिसरातील बालकलावंत गायक तसेच नामवंत गायक अभंग गायन सादर करणार असून जवळपास ३० कलावंत या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचा लाभ बीडकर रसिक श्रोत्यांनी घ्यावा, असे आवाहन नाट्य परिषद अध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, स्नेहल पाठक, डॉ. शिवानंद क्षीरसागर, डॉ. संजय पाटील देवळाणकर, भरत लोळगे, अनुराधा चिंचोलकर, मिलिंद शिवणीकर, विलास सोनवणे, राहुल सोनवणे, दुष्यंत रामटेके, दीपक जमधाडे, अमित गाडे, अनिता शिंदे, नामदेव साळुंके, सुरेश साळुंके, सुरेश थोरात, विजय राख तसेच नाट्य परिषद व बालरंगभूमी परिषदेचे सदस्यांनी केले आहे.



**नवगण राजुरी (प्रतिनिधी)**

**येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विविध स्पर्धा परीक्षेचे डिजिटल क्लास सुरू करण्यात आले आहेत. नवोदय, स्कॉलरशिप आदि स्पर्धा परीक्षेचे डिजिटल क्लासचे उद्घाटन प्राचार्य प्रशांत पवळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा.सुशिलाताई मोराळे, दादासाहेब मुंडे, पत्रकार सतीश बहीर, उपमुख्याध्यापक शिंदे एस. एस, पर्यवेक्षक विजयकुमार दगडे, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.**

# धर्माबादेत वाहन चोरटे पुन्हा सक्रिय झाल्याने पोलिसापुढे नवे आव्हान

धर्माबाद / अशोक पडोळे

शहरातील फुलेनगर येथून विजय माधनुरे वडगावकर यांचा प्रवासी ऑटो क्रमांक ए पी २५ डब्ल्यू ८०७२ दिनांक ४ जुलै च्या मध्यरात्री चोरीस गेल्यामुळे वाहनधारकांमध्ये पुन्हा एकदा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.धर्माबाद शहर व परिसरात वाहन चोरट्यांनी वाहनाच्या चोरीचा धुमाकूळ माजवला असून मागील काही दिवसातच जवळ पास चौदा प्रवासी ऑटो चोरीस गेले आहेत. दिनांक २९ जून २०२५ रोजी सहा प्रवासी ऑटो धर्माबाद पोलिसांनी पुसद (जिल्हा यवतमाळ) येथून मोठ्या सीताफिने हस्तगत केले होते. त्यानंतर आणखी काही ऑटोचा शोध लागल्याने पोलिसांचे पथक पुसद येथून ऑटो हस्तगत करण्यासाठी गेले आहेत. याप्रकरणातील चार आरोपी अटक असताना दिनांक चार जुलै च्या मध्यरात्री २:४० वाजता फुलेनगर येथील पत्रकार सुदर्शन वाघमारे यांच्या घरासमोरील विजय माधनुरे वडगावकर यांचा एपी २५ डब्ल्यू ८०७२ या क्रमांकाचा ऑटो चोरट्यांनी पळविला आहे. या चोरीचे सर्व प्रकरण सीसीटीव्ही मध्ये रेकॉर्ड झालेले आहे.

ऑटो चोरीच्या प्रकरणात चार आरोपी अद्यापही धर्माबाद पोलीस स्टेशन मध्ये अटक असताना चार जुलै च्या मध्यरात्री प्रवासी ऑटोची चोरी झाली असल्यामुळे पुन्हा वाहन चोरांची दुसरी टोळी सक्रिय झाली आहे का ? अशी भीती वाहन धारकांमध्ये निर्माण झाली आहे. ही घटना म्हणजे पोलिसांना आव्हान देणारी ठरली आहे.



## बाळासाहेब सोनसळे यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप

माजलगाव (प्रतिनिधी)

पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा येथे कार्यरत असणारे माध्यमिक शिक्षक तथा प्रख्यात व्याख्याते बाळासाहेब सोनसळे यांच्या वाढदिवसानिमित्त मार्तंड बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विशाल देवकते तसेच सराफा असोसिएशनचे अध्यक्ष रामराजे रांजवन व प्रगतशील शेतकरी काशिनाथ काटकर यांच्या वतीने शाळेतील पहिली ते चौथी वर्गाच्या विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक मिलिंद गरबडे तर प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक तथा माजलगाव सहकारी शिक्षक पतसंस्थेचे माजी अध्यक्ष दिनकर वाघमारे हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख शरद नायबळ यांनी केले.मार्तंड बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विशाल देवकते व सराफा असोसिएशनचे अध्यक्ष रामराजे रांजण यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या व सर्व अतिथींच्या हस्ते विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. मार्तंड बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या मार्फत दरवर्षी वेगवेगळया मान्यवरांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी दीड हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येते. याप्रसंगी बाळासाहेब सोनसळे यांनी आभार व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका मंदा सारुक, संगीता राठोड,जयश्री लोणीकर,ज्योती कोडगीरकर,संगीता शिंदे,सुंदर काळे,नारायण भालशंकर,चंद्रकांत यादव,बालासाहेब कांबळे,शेख अब्दुल,बालासाहेब जामकर,सौदागर हबीब,गोरख केले, संतोष साळवे यांनी मोलाचे सहकार्य केले.


# व्हिपीके उद्योग समूहाच्या वतीने ऊस पीक स्पर्धेत विजेत्या शेतकऱ्यास बुलेट मोटारसायकल भेट

## एमव्हीके ग्रो साखर कारखाना कुसुमनगार वाघलवाडाचे रोलर पूजन कार्यक्रम संपन्न

धर्माबाद / अशोक पडोळे

कुसुमनगर वाघलवाडा कारखाना येथे कार्यक्रमाचे आयोजन व्हिपीके उद्योग समूहाच्या वतीने लागवड हंगाम २०२३ - ०२४ मध्ये उच्चांकी ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ऊस पीक स्पर्धेचे आयोजन केले होते त्या स्पर्धेत मौजे सिंधी ता.उमरी येथील शेतकरी श्री बालाजी सदाशिव शिंदे यांनी एकरी ९१.५८३ मे. टन उत्पादन घेऊन स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्तीचा बहुमान मिळविला आहे. त्यांना बक्षीस वितरण करून सत्कार करण्याचा कार्यक्रम उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष श्री मारोतराव पाटील कवळे गुरूजी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

सन २०२३-२४ या लागवड हंगामातील शेतकरी १ एकर जमिनीवर १०००१ या जातीचे ऊस रोप कारखान्या तर्फे घेऊन उसाची लागवड केली. हा ऊस आडसली असून १५ ते १६ महिन्यात तोड झाल्यानंतर त्याचे एकरी ९१ .५८३ मे. टन उसाचे उत्पन्न झाले. कवळे गुरुजी यांनी बोलल्याप्रमाणे प्रथम येणाऱ्या शेतकऱ्याला आज कुसुमनगर वाघलवाडा येथे हजारो शेतकरी बांधवाच्या उपस्थितीत बुलेट मोटारसायकल देऊन फेटा बांधून त्यांचा सन्मान करण्यात आला.गुरुजींच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील शेतकरी हा आर्थिकद्रष्ट्या सक्षम झाला पाहिजे, ह्या हेतूने गावोगावी सभा घेऊन शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतीतून ऊस पिकाचे नियोजन कसे केले पाहिजे खत मात्रा फवारणी बेसल डोसेस या गोष्टीमुळे शेतकरी हा ह्या भागात प्रगत होत असताना दिसत आहे. तसेच या कार्यक्रमात अपघाती निधन झालेल्या ऊसतोड मजूराच्या वारसांना विमा कंपनीतर्फे ३ मजूर व १ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी ३ लाख रुपयांचा धनादेश सुद्धा देण्यात आला. या कार्यक्रमाला भागातील सर्व सन्माननीय शेतकरी बांधव तसेच प्रमुख उपस्थितीत




संचालक गणेशराव पाटील कवळे, सीईओ संदीप पाटील कवळे, ज्येष्ठ नेते गणपतराव पाटील हासेकर, जेष्ठ मार्गदर्शक लक्ष्मणराव पाटील हरेगावकर, मधुकर पाटील बोळसेकर,माजी सरपंच पांडुरंग पाटील वाघलवाडेकर,आनंदराव पाटील भायगावकर, तानाजी पाटील शिंदे हरेगावकर, साईनाथ पाटील हिरडगावकर, दत्ताहरी पाटील हिवराळे शिंगणापूरकर, शंकर पाटील पुयड,सुदर्शन पाटील पुयड, पोलीस पाटील पिनलवार साहेब,मारोतराव किन्हेवाड, युवा उद्योजक प्रकाश पाटील नरवाडे, प्रगतिशील शेतकरी बालाजी पाटील शिंदे बोळसेकर, विठ्ठलराव पाटील फुलारी गोरठेकर, ओम पाटील कवळे सिंधीकर, बालाजी पाटील इज्जतगावकर, श्रीनिवास पाटील ढगे इज्जतगावकर, नागोराव पाटील हिवराळे, आकाश पाटील कवळे, विश्वनाथ पाटील कुदळेकर, यांच्यासह असंख्य शेतकरी उपस्थित होते.सदरील कार्यक्रमाचे प्रस्तविक कारख्यान्याचे जनरल मॅनेजर एस. जी आंबटवार, यांनी केले, सूत्रसंचालन बाबुरावजी भोसले तर नियोजन व आभार श्री यु.जी कदम जनसंपर्क अधिकारी, यांनी मांडले. या कार्यक्रमास कारखान्याचे अधिकारी चीफ इंजिनिअर येनडाळे साहेब, प्रोसेस मॅनेजर अमृते साहेब,टीजीएम श्री दुधाटे साहेब, मुख्य शेतकी अधिकारी प्रकाशजी पवार, शेतकी अधिकारी शेख रफिक साहेब, ऊस विकास अधिकारी श्री पडवळे साहेब,ऊस विकास अधिकारी साईनाथजी सावंत, चिफ अकाउंटंट संजयजी भिसे साहेब, कार्यालयातील अधीक्षक श्रीकांतकदम, चीफ इंजिनिअर श्री वाडियार साहेब, ऊस पुरवठा अधिकारी श्री वाघ साहेब, उमाटे साहेब, विभागातील सर्व फिल्ड ऑफिसर कर्मचारी कामगार आधी

# प्रियल नितीन धांडेची अबॅकस ऑर्गनायझेशन कौन्सिलच्या जागतिक चॅम्पियनशिपसाठी निवड

बीड ।प्रतिनिधी

शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होत असून अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. दिनांक २४ जून २०२५ मध्ये झालेल्या सेकंड लेवल स्तारावरील अबॅकस परीक्षेमध्ये प्रियल नितीन धांडेने ऐतिहासिक यश संपादन केलेले आहे.

प्रियल नितीन धांडेने फक्त दहा मिनिटांमध्ये साठ प्रश्न सोडवल्यामुळे सर्वोत्कृष्ट प्रथम चॅम्पियनशिप- चॅम्पियन म्हणून निवड झाली आहे. शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींद्वारे सत्कार करण्यात आला असून ऑगस्ट २०२५ महिन्यामध्ये होणाऱ्या अबॅकस असोसिएशन स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिपसाठी प्रियल नितीन धांडेची निवड करण्यात आलेली आहे. वर्ल्ड अबॅकस चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अमेरिका, तैवान, चीन, जपान, सिंगापूर अशा जगातील ११ देशातील १५५० एकूण विद्यार्थ्यांपैकी सहभाग घेणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये प्रियल नितीन धांडेची जागतिक स्तरावर निवड झालेली आहे. इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेमध्ये ब्रेन किड्स स्तरावरील प्रतिष्ठित समजले जाणारी तसेच अबॅकस इंटरनॅशनल सर्वोत्कृष्ट जागतिक विद्यार्थ्यांचे प्रथम यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमांमध्ये अबॅकस मास्टर ट्रेनर डॉ घोडके ए एस प्रियलचा सत्कार करून प्रियल नितीन धांडेची गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न केल्यामुळे यश मिळालेले आहे असे प्रियल धांडेच्या आई - वडिलांनी यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले आहे असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.

आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग



शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास तसेच विद्यार्थ्यांचा गणितामधील आवड निर्माण होऊन गणिताबद्दलची मनात असलेली भीती नष्ट होऊन अनेक क्लिष्ट अशा गणितीय पद्धती सोप्या पद्धतीने सोडवल्यासाठी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग केला जातो असे जिल्हा अबॅकस वितरक घोडके एस ए यांनी सांगितले आहे.

# दौलावडगाव जि.प.गटातून सरपंच रघुशेठ घुले बाजी मारू शकतात

आष्टी (प्रतिनिधी)

काही महिन्यांच्या अंतरावरच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका लागणार असल्याने प्रत्येक जण आपापली राजकीय बांधणी करत असताना दिसत आहेत. त्यातच आष्टी, पाटोदा व शिरूर मतदार संघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांचे खंदे समर्थक व दोन वेळा कारखेल खुर्द येथील लोकनियुक्त सरपंच रघुशेठ घुले यांना दौलवडगाव जिल्हा परिषद गटातून उमेदवारी द्यावी अशी मागणी आता दौलवडगाव व परिसरातील कार्यकर्त्यांकडून जोर धरु लागली आहे. याचे कारण ना नफा, ना तोटा हा राजकीय वारसा हातात घेऊन त्यांनी आजपर्यंत कारखेल गावचा विकास केला आहे.

सतत समाजसेवेची नाळ असणारे सरपंच म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांचा दौलवडगाव परिसरात दांडगा जनसंपर्क असल्याने प्रत्येक गावातील जनतेशी त्यांची



नाळ जोडलेली आहे. त्यामुळे आमदार सुरेश आण्णा धस यांनी त्यांना जर दौलावडगाव जिल्हा परिषद गटाची उमेदवारी दिली तर त्यांचा विजय मात्र निश्चित मानला जातो अशी चर्चा आता गावागावात चालू आहे. त्यामुळेच अशा एकनिष्ठ कार्यकर्त्याला व कसलीही आशा न बाळगता काम करणाऱ्या सरपंचाला उमेदवारी मिळावी अशी मागणी आता जनतेमधून जोर धरू लागली आहे.

# आदर्श शिक्षक बापू शिंदे यांची दिल्ली येथे बीएलओ प्रशिक्षणासाठी निवड



आष्टी (प्रतिनिधी)

पीएम श्री जि. प. मा. शा. आष्टा ह. ना. ता. आष्टी, जि. बीड येथील आदर्श शिक्षक, स्काऊट मास्टर तथा बी. एल. ओ. बापू बाबा शिंदे यांची आष्टी विधानसभा मतदार संघाअंतर्गत बीएलओ चे प्रतिनिधित्व करण्यासाठी नवी दिल्ली येथे ३ जून ते ४ जून २०२५ या दोन दिवसाच्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. याकरिता त्यांची बुध लेव्हल ऑफिसर प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली आहे.

बापू शिंदे यांची दिल्ली येथे प्रशिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल त्यांचे आष्टी मतदार संघाचे लोकप्रिय आमदार सुरेश आण्णा धस, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन धस, तहसिलदार वैशाली पाटील, नायब तहसिलदार प्रकाश शिरेसवाड, महसुल सहाय्यक अधिकारी शिवप्रसाद गारोळे, ऑपरेटर विशाल मोकाशे, मा. जि. प. सदस्य अमरराजे निंबाळकर, सरपंच गणेश माळवे, उपसरपंच वैभव पठाडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय पठाडे, शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ मुटकुळे, केंद्रप्रमुख धर्मनाथ शिंदे, पतसंस्थेचे चेअरमन मारूती पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेशकुमार शिंदे, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष संदिप खराडे, मच्छिंद्रनाथ जगताप, बाळासाहेब शेंदूरकर, अशोक पठाडे, प्रविण गांगुर्डे, मिलिंद नेटके, व आष्टा शाळेच्या सर्व शिक्षक वृंदानी बापू शिंदे यांचे अभिनंदन केले.

## जनतेच्या अग्रस्ताव भीमाशंकर मामा कापसे माळाकोळी सर्कल मधुन आगामी

# जि.प.च्या निवडणुकीत उतरणार माळाकोळी सर्कल चा विकास साधणार

लोहा / प्रतिनिधी

आझाद ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष भीमाशंकर मामा कापसे हे जनतेच्या अग्रस्ताव माळाकोळी सर्कल मधुन आगामी जिल्हा परिषदेची निवडणूक लढविणार व माळाकोळी सर्कल चा सार्वोंगिन विकास साधणार. आझाद ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष भीमाशंकर मामा कापसे हे गेल्या सात ते आठ वर्षांपासून लोकहित सर्वोपरी हे घोषवाक्य घेऊन जनतेच्या सेवेत दाखल आहेत.भीमाशंकर कापसे मामा यांनी आझाद ग्रुपच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक,व धार्मिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविला अनेक गोरगरीब विद्यार्थी, शेतकरी, कष्टकरी यांच्यासह अनेकांना त्यांनी वेळोवेळी मदत केली. आझाद ग्रुपच्या माध्यमातून



त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबविले .

भीमाशंकर मामा कापसे हे स्वच्छ, निर्मळ, निर्व्यसनी स्वभावाचे मितभाषी सर्वांना आपुलकीने बोलणारे चारित्र्य संपन्न व्यक्तिमत्व असुन ते लोहा तालुक्यातील रिसनगावचे भूमीपुत्र आहेत. त्यांनी पुणे येथे उद्योग व्यवसायानिमित्त जाऊन सचोटीने कार्य करुन एक यशस्वी उद्योजक झाले आहेत त्यांनी आपल्या मेहनतीने शुन्यातून विश्व निर्माण केले आहे. त्यांच्याकडे आज सर्व काही आहे पण त्यांच्या डोक्यात यशाची हवा कधी गेली नाही. ते नेहमी आपल्या मायभूमीत येऊन लोकांशी मिळून मिसळून वागतात . आझाद ग्रुपच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवितात.त्यांनी आगामी जिल्हा परिषदेची निवडणूक माळाकोळी सर्कल मधुन लढवावी अशी मागणी या भागातील जनतेतून होत असुन जनतेच्या अग्रस्ताव ते माळाकोळी सर्कल मधुन आगामी जिल्हा परिषदेची निवडणूक लढविणार व माळाकोळी सर्कल चा सार्वोंगिन विकास साधणार असा संकल्प त्यांनी केला आहे आणि राजकारण म्हणजे त्यांच्या साठी नर्मदा परिक्रमा आहे आणि नर्मदा परिक्रमा केल्यास मनाला शांति मिळते आणि

तीच त्यांना मिळवायची आहे. पैसे कमवण्यासाठी ते राजकारणात येत नाहीत पैसे कमवण्यासाठी त्याना पुणे येथे रॉयल मार्ग आहेत असे मत

## महाराष्ट्र शासन भूखंड पुनर्विकास समितीवर विशेष निमंत्रित सदस्य पदी नियुक्ती झालेल्या पदाधिकार्यांचा सत्कार संपन्न

मुंबई (प्रतिनिधी)

मुंबई शासकीय वसाहतीतील शासकीय भूखंडाच्या पुनर्विकासासाठी गठित समितीवर महाराष्ट्र शासनातर्फे विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल मुंबई भाजपा उपाध्यक्ष सुहास आडिवरेकर व चिटणीस महेश पारकर यांचा अभिनंदन सोहळा सत्कार समारंभ भाजपा वांद्रे पूर्व विधानसभा वॉर्ड क्रमांक ९३ च्या वतीने गुरुवार दिनांक ३ जुलै २०२५ रोजी गकवारे असोसिएशन हॉल, सरकारी वसाहत इमारत क्र. ६ च्या समोर, खेरवाडी पोलीस चौकीच्या बाजूला वांद्रे पूर्व मुंबई येथे संपन्न झाला .

याप्रसंगी सर्व प्रथम प्रास्तविक करतात संस्थेचे पदाधिकार्यांनी सांगितले की, यापुर्वी आम्ही ११ उपोषण केलेल्या नंतर राज्य शासनाने त्याची दखल घेऊन तात्काळ ऋठ काढून आम्हा शासकीय वसाहतीतील रहिवाशांना मालकी घरे मिळवण्यासाठी भुखंड अलाव केला.गकवारे संस्थेचे अध्यक्ष राजेश जाधव म्हणाले की, गेली ११ वर्षे आम्ही आंदोलन करत आहोत कारण आम्हाला हक्काचे घर व भुखंड मिळावे . या काळात आम्हाला भाई



### सुहास आडिवरेकर, महेश पारकर यांची नियुक्ती

गिरकर, विनोद तावडे, आशिष शेलार व पराग अळवणी यांनी खूप मदत केली. या सर्वांच्या पाठपुराव्यामुळे सार्वजनिक बांधकाममंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी प्रत्येक येऊन या जागेची पाहणी केली. यावेळी महेश पारकर यांनी ही आपले विचार व्यक्त केले.सुहास आडिवरेकर यांनी सांगितले की, गकवारे च्या माध्यमातून आपल्या हक्काच्या घराची चावी मिळतील, त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे. यापुर्वी जे आपल्या सोबत आंदोलनात सोबत होते. काही सेवानिवृत्त झाले तर काही स्थलांतरित झाले आहेत. त्यांचा पण आपण विचार झाला पाहिजे. त्यासाठी आपण सोसायटी व गकवारे मिळून शासनाला रितसर पत्र दिले पाहिजे.यापुर्वी देवेंद्र फडणवीस यांनी आस्वासन दिले होते. आशिष शेलार यांनी निवडणूकीपुर्वीच शब्द दिला होता. देवेंद्रजी विनोदजी, आशिषजी यांनी दिलेला शब्द तंतोतंत पाळला आहे. आपली लढाई ही शासन दरबारी आहे. त्यामुळे आपण अस अभ्यास करा जे आम्ही मांडल्यानंतर आम्हाला त्यांच्याकडून वेधून घेणे व पास करून घेणे शक्य होईल येवढी मागणी करा सर्व आंदोलनकर्त्यांना मिळाली पाहिजे. या प्रसंगी व्यासपीठावर एड. राजेश दाभोळकर, प्रसाद मरगज, सुवर्णा आगरकर

# विद्यार्थ्यांना विचारांची गरिबी असता कामा नये -जिल्हाधिकारी डॉ. सुनील स्वामी

लोहा ।प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना विचारांची गरिबी असता कामा नये असे प्रतिपादन लोहा तालुक्यातील गोलेगाव (प.कं)चे भूमीपुत्र जिल्हाधिकारी डॉ. यांनी गोलेगाव (प.कं) येथे भव्य नागरी सत्कार समारंभ कार्यक्रमात केले. लोहा तालुक्यातील मौजे गोलेगाव (प कं.) चे भूमीपुत्र डॉ.सुनिल रामलिंग स्वामी यांनी नुकतेच युपीएससी परीक्षेत घवघवीत यश मिळून कलेक्टर (आयएएस) होण्याचा मान मिळवला असल्यामुळे त्यांचा दि. ३ जून रोजी त्यांच्या गावी गोलेगाव (प.कं) व गोलेवाडी गावकरी मंडळी व.जि .पण.प्रा.शाळा गोरेगाव (पण.कं) गोलेगाववाडी तर्फे भव्य नागरी सत्कारांचे आयोजन व जि.प.के.प्रा. शाळेतील विद्यार्थ्यांना व युवकांना मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त केंद्र प्रमुख नामदेवराव केंद्रे होते तर प्रमुख उपस्थिती लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक केरबा केंद्रे,गोलेगाव (प.कं) च्या सरपंच अर्चनाताई केंद्रे, केंद्रप्रमुख विठ्ठलराव आचणे, मुख्याध्यापक पी.डी. पोले, बोधनकर सर, गव्हाणे सर,माने सर,लोंड सर,लुंगारे मॅडम,जामगे मॅडम, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आनंदा गारोळे, डॉ.गजानन भारती, शाळेतील विद्यार्थी , गावातील युवक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी डॉ.सुनिल स्वामी यांचा गावकऱ्यांच्या वतीने भव्य नागरी सत्कार करण्यात आला. तसेच गावात प्रवेश करताना फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करून ढोल ताशांच्या




गजरात लेझीम पथकांसह उघड्या जीपमधून भव्य रॅली काढण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांना व युवकांना मार्गदर्शन करताना डॉ. सुनील स्वामी म्हणाले की, विद्यार्थ्यांना युवकांना विचारांची गरिबी असता कामा नये. एकवेळ पैशाची गरिबी असलेली चालेल ती दूर ही करता येईल पण विचारांची गरीबी दूर करता येत नाही. त्यामुळे सकारात्मक विचार करावे. मी सुद्धा जि.प. शाळेत शिकलो. जि.प.शाळेतील विद्यार्थीनींनी स्वतः कमी समजू नये . त्यांनी अभ्यास करुन मोठे व्हावे असे जिल्हाधिकारी डॉ.सुनिल स्वामी म्हणाले.

## समाजसेवक विजयकुमार गोल्हार यांना साक्षात गरुडदेवांचे दर्शन

आष्टी (प्रतिनिधी)

गरुड दिसणे हे शुभ असू शकते, परंतु सामान्यतः ते सकारात्मक बदलांचे आणि यशाचे लक्षण मानले जाते. जर तुम्हाला अचानक एखादा गरुड दिसला किंवा त्याचे चित्र दिसले, तर ते तुमच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडणार असल्याचे संकेत असू शकतात, जसे की रखडलेली कामे पूर्ण होणे, असे एका ज्योतिषीय वेबसाइटने नमूद केले आहे. गरुड हे शक्ती, धैर्य आणि यशाचे प्रतीक आहे. त्यामुळे, गरुड दिसणे म्हणजे तुम्ही करत असलेल्या कामात तुम्हाला यश मिळेल असा विश्वास ठेवला जातो, असे अनेक ज्योतिष तज्ञांचे मत आहे. गरुडाला आकाशात उंच उडताना पाहणे म्हणजे उच्च दृष्टिकोन ठेवणे, आपल्या मर्यादा ओलांडून विचार करणे आणि समस्येकडे अधिक व्यापक दृष्टीने पाहणे.भोग तो ना घडे, संचिता वाचोनी हा संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचा अभंग मानवी जीवनातील नशीबाचं स्थान विशद करतो. मुळामध्ये एखाद्या क्षेत्रात



प्रामाणिक कष्टासोबतच कणभर पुण्य, नशीब देखील आपल्यासोबत असावंच लागतं. तेव्हा कुठे कार्य सिद्धीस जातं.

समाजसेवक विजयकुमार गोल्हार यांना लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांसोबत त्यांचा सेवेकरी म्हणून काम करण्याचा योग आला होता, तसाच आदरणीय लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या सोबतही काम करण्याची संधी मिळाली. या गोष्टी अगदी सहजतेने कधीच साध्य होणा-या नव्हत्या. प्रामाणिकपणा, निष्ठा, प्रयत्नांतील सातत्य आणि नेतृत्वाच्या यशापयशात सोबत राहणं या सगळ्यांचा तो परिपाक म्हणावा लागेल. उदाहरणच घ्यायचं झालं तर दिनांक १ जुलै रोजी सकाळी आष्टी तालुक्यातील सुरुडी येथे कार्यकर्त्यांच्या भेटीगाठीच्या प्रवासासाठी जात असताना विजयकुमार गोल्हार यांना साक्षात भगवान श्री. विष्णुंचे वाहन गरुड देवतांचे दर्शन झाले. त्याचवेळी सोबत असलेल्या कार्यकर्त्यांनी हा दुर्मिळ क्षण कॅमे-यात टिपून घेतला. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्यावर जिवापाड प्रेम करणा-या सुरुडी या गावी त्यांचा पाईक म्हणून कार्य करणाऱ्या विजयकुमार गोल्हार यांना गरुडदेवांचे झालेले दर्शन हा लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचाच आशीर्वाद असावा असे कार्यकत्याकडून बोलले जात आहे. जन्मोजन्मी आम्ही बहुपुण्य केले, तेंव्हा या विठ्ठले कृपा केली असेच काहीसे म्हणावे लागेल. कारण गरुड दिसणे हा आयुष्यातील दुर्लभ योग विजयकुमार गोल्हार यांना लाभला आहे.

# कर्म हाच देव -निवृत्ती महाराज इंदुरीकर ....!

### आमदार विलास भुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त कीर्तनासाठी हजारो भाविकांची गर्दी....!

पैठण (प्रतिनिधी)

दावरवाडी येथील पैठण तालुक्याचे आमदार विलास बापू भुमरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त ह.भ.प निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर जाहीर हरिकीर्तन संपन्न झाले या कार्यक्रमाचे नियोजक ऋषिकेश भगवानराव तांगडे यांच्यावतीने ठेवण्यात आले होते या जाहीर हरी कीर्तनासाठी हजारोच्या संख्येने दावरवाडी सर्कल मधून जाहीर कीर्तन ऐकण्यासाठी



भाविकांची गर्दी झाली होती जाहीर कीर्तनाद्वारे इंदुरीकर म्हणतात आपल्या मुलांना चांगले संस्कार द्या मुलाकडे लक्ष द्या शाळेत मोबाईल देऊ नका मोबाईल मुळे मुलांचे ध्यान विचलित झाले आहे ध्यान आहेत ज्ञान आहे असे जाहीर कीर्तनात सांगितले या जाहीर कीर्तनासाठी उपस्थिती पाचोड गावचे सरपंच शिवराज भैय्या भुमरे डॉक्टर भगवानराव तांगडे इंजिनीयर पंचायत समिती पैठण ऋषिकेश तांगडे व गावातील नागरिकांची यावेळी उपस्थिती दर्शवली होती

## काँग्रेस पक्षाच्या बीड तालुकाध्यक्षपदी गणेश बजगुडे पाटील यांची फेर निवड

बीड ।प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या महासचिव राज्यसभा खासदार रजनीताई अशोकराव पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ यांच्या नेतृत्वात जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांनी दिनांक २१ जुन २०२५ रोजी बीड जिल्ह्यातील ११ तालुकाध्यक्षांच्या निवडी जाहीर करुन नियुक्तीपत्र दिले.यामध्ये बीड तालुका काँग्रेस अध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा एकदा गणेश दादा बजगुडे पाटील यांना देण्यात आली.

गणेश बजगुडे पाटील हे मागील अनेक वर्षांपासून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणारे सर्वपरिचित धडाडीचे नेतृत्व असुन मागील कार्यकाळात पक्ष संघटनेसाठी केलेल्या कामाची दखल घेत त्यांची पुन्हा एकदा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या बीड तालुकाध्यक्षपदी निवड करत नियुक्तीपत्र देण्यात आले. ही निवड योग्य व सर्व सामान्य कार्यकर्त्यांना बळ देणारी असुन पक्ष संघटन वाढीसाठी महत्वाची ठरणार आहे. कर्तृत्व, दातृत्व व वक्तृत्वाचा त्रिवेणी संगम व तालुक्यातील वाडी वस्ती गाव खेड्यांपर्यंत असलेला प्रत्यक्ष संपर्क तालुकाभरात सर्वपरिचित व पुर्णवेळ लोकांसाठी उपलब्ध असणाऱ्या या नेतृत्वामुळे बीड तालुका व मतदार संघात काँग्रेस पक्षाला निश्चित बळकटी मिळेल. त्यांच्या निवडीबद्दल त्यांना लोकनेत्या खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, युवा नेते आदित्य दादा पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे पाटील यांच्यासह विविध पक्ष संघटनेसह अनेक सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

प्रामाणिक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना काँग्रेस पक्षातच न्याय मिळतो - गणेश बजगुडे पाटील

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या बीड तालुकाध्यक्षपदी गणेश बजगुडे पाटील यांची फेरनिवड झाल्यानंतर बोलताना गणेश बजगुडे पाटील म्हणाले की, मी मागील तीन वर्षाच्या तालुकाध्यक्ष पदाच्या कार्यकाळात प्रामाणिकपणे केलेल्या कामाची पावती म्हणुन माझे नेते माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब, खासदार रजनीताई अशोकराव पाटील, युवा नेते आदित्य दादा पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांनी



माझ्यावर ज्या विश्वासाने पक्ष संघटन वाढीसाठी पुन्हा एकदा बीड तालुकाध्यक्ष पदाची अतिशय महत्वाची जबाबदारी दिली त्या विश्वासाला कधीही तडा न जावु देता बीड तालुक्यातील सर्व जुन्या नव्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन पक्ष संघटन वाढीसाठी प्रामाणिक प्रयत्न करेल. त्याच बरोबर आगामी काळात होवु घातलेल्या सर्व जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका देखील आम्ही ताकतीने लढू आणि जिंकू असे काँग्रेसचे नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील

# वैंद्यकिन्ही येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचु भिंत कोसळली ; रात्री कोसळल्याने दुर्घटना टळली :- डॉ.गणेश ढवळे

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची भिंत कोसळली. भिंत रात्री कोसळल्याने दुर्घटना टळली. त्यामुळे तिसरी वर्गातील मुलांचा वर्ग आज झाडाखाली भरविण्यात आला होता. गेल्या ४-५ वर्षांपासून सातत्याने शिक्षण विभागाला पाठपुरावा करूनही शाळेच्या नविन बांधकाम ईमारतीसाठी निधीची तरतूद न केल्याने सरपंच अतुल मकाळ यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली. पालक घडलेल्या घटनेमुळे भयभीत झाले असुन मुलांना शाळेत पाठवावे की नाही या चिंतेत आहेत. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपमुख्यमंत्री, वित्त मंत्री व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी बीडच्या विमानतळासाठी निधी देऊन चिंता करण्यापेक्षा बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणासाठी मुलभूत सुविधा द्याव्यात अशी उद्विग्न प्रतिक्रिया दिली.

पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा १९५३ सालची असुन १ ते ७ वी पर्यंत वर्ग असुन एकुण पटसंख्या १३० आहे. एकुण ८ वर्गखोल्या पैकी ६ धोकादायक स्थितीत आहेत. कार्यालयाच्या छताचे पोपडे पडत आहेत. काल दि.३ गुरुवार रोजी मध्यरात्री ३ वर्ग अध्यापन सुरू असलेल्या वर्गाची भिंत कोसळली. रात्री भिंत कोसळल्याने दुर्घटना टळली. दिवसा भिंत कोसळली असती तर गंभीर घटना घटली असती. विस्तार अधिकारी गटशिक्षण विभाग पंचायत समिती पाटोदा हनुमान गव्हाणे यांनी शाळेला भेट दिली.



१९५३ सालची शाळा असल्याने शाळेच्या ईमारतीची दुरावस्था झालेली आहे. शाळेच्या कार्यालयाच्या छताचे पोपडे कोसळुन लोखंडी गज ऊघडे पडलेले आहेत.४-५ वर्षांपासून वारंवार शिक्षण विभागाकडे शाळेच्या नविन ईमारत बांधकामासाठी निधी देण्यात यावा म्हणून पाठपुरावा केला आहे मात्र शासन आणि प्रशासनाला याचे गांभीर्य दिसून येत नाही. सध्या तिसरीचा वर्ग झाडाखाली भरविण्यात आला असुन एक दोन दिवसात ग्रामपंचायत कार्यालयात त्यांची व्यवस्था करण्यात येणार आहे. हा मुलांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार अत्यंत दुर्दैवी असल्याचे सरपंच अतुल मकाळ यांनी सांगितले.

काल रात्री घडलेल्या घटनेमुळे मुलांना शाळेत पाठवायची भिती वाटते. माझे शिक्षण याच शाळेत झाले आहे. शासनाचे सरकारी शाळांकडे दुर्लक्ष असल्याने पालकांचा ओढा खाजगी शाळेकडे वळला आहे. शासन आणि प्रशासनाने लक्ष देण्याची गरज असल्याचे पालक डॉ.सारीका माने यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यातील ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या धोकादायक असुन विद्यार्थ्यांना त्यात अध्यापन करू नये अशा शिक्षण विभागाने सुचना दिलेल्या आहेत.परंतु नाईलाजाने विद्यार्थी आणि शिक्षक जीव मुठीत घेऊन ज्ञानार्जन करत आहेत. पालकमंत्री अजितदादा पवार यांनी ५७५ कोटींचा निधी जिल्हा नियोजन विभागांसाठी मंजुर केला आहे परंतु अद्याप दिला नाही. मोडकळीस आलेल्या शाळांच्या ईमारतीसाठी निधी देण्याऐवजी विमानतळ बांधण्यासाठी अजितदादा आग्रही असुन त्यांनी ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणासाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# काँग्रेस परळी शहराध्यक्षपदाची माळ पुन्हा (हानिफ करीम सय्यद) बहादुरभाई यांच्याच गळ्यात



परळी (प्रतिनिधी)

राज्यात काँग्रेसच्या वतीने पक्षाची पुन्हा नव्याने बांधणी करण्यासाठी पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात येत असून बीड जिल्ह्यातील निवडी करण्यात आल्या असून परळी शहर अध्यक्ष पदाची ही निवड करण्यात आली असून काँग्रेस परळी शहराध्यक्षपदाची माळ पुन्हा (हानिफ करीम सय्यद) बहादुरभाई यांच्याच गळ्यात टाकली आहे.या निवडीमुळे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

माजीमंत्री अशोक पाटील व बीड जिल्हा कांग्रेस कमेटीचे जिल्हाध्यक्ष जिल्हा अध्यक्ष श्री राहुल सोनवणे यांनी आज शुक्रवारी (हानिफ करीम सय्यद) बहादुरभाई यांना परळी शहर अध्यक्ष पदाच्या निवडीचे पत्र देण्यात आले.निवडीच्या दिलेल्या पत्रात नमूद केले आहे कि,महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या आदेशानुसार मी आपली वै. परळी शहर काँग्रेस अध्यक्ष पदी निवड करीत आहे.आपणास जाणीव आहे की, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष आदरणीय मल्लीकार्जुन खर्गे साहेब, देशाच्या नेत्या आदरणीय सोनियाजी गांधी, देशाचे विरोधी पक्ष नेते आदरणीय श्री. राहुलजी गांधी, अखिल भारतीय काँग्रेस कार्यसमितीच्या सदस्या तथा हिमाचल प्रदेश प्रभारी आदरणीय खासदार सौ. रजनीताई पाटील, महाराष्टाचे प्रभारी श्री. रमेश चेन्नीथलाजी, बीड जिल्हा प्रभारी मा. श्री. देविदासजी भन्साळी, हे विद्यामान भाजप सरकारच्या जातीय व धार्मिक तेड निर्माण करणाऱ्या धोरणावर तसेच सर्व सामान्य जनतेला भेडवसावण्याच्या महागाई आणि भ्रष्टाचार या सारख्या गंभीर विषयावर जागरुकता निर्माण करण्यासाठी दिवस रात्र मेहनत घेत आहेत. धर्मनिरपेक्ष आणि सर्व समावेशक विकास देणारे काँग्रेस सरकार राज्यत व देशात आणण्यासाठी मेहनत घेत आहेत.आपणही काँग्रेसच्या मार्फत पक्षाला बळकटी देण्यासाठी प्रचंड मेहनत घ्याल याची मला खात्री आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे व आपले सर्वांचे लाडके नेते अखिल भारतीय काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष आदरणीय मल्लीकार्जुन खर्गे साहेब, देशाच्या नेत्या आदरणीय सोनियाजी गांधी. व आपले सर्वाचे लाडके नेते देशाचे विरोधी पक्ष नेते आदरणीय श्री. खासदार राहुलजी गांधी, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. हर्षवर्धन सपकाळ साहेब, अखिल भारतीय काँग्रेस कार्यसमितीच्या सदस्या तथा हिमाचल प्रदेश प्रभारी आदरणीय खासदार सौ. रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकरावजी पाटील साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसला सर्वसामान्यांना हाक्काचे व्यासपिठ निर्माण करण्यासाठी आपण दिवस-रात्र मेहनत घ्याल अशी आशा व्यक्त करतो असे नमुद केले आहे.काँग्रेस परळी शहराध्यक्षपदाची माळ पुन्हा (हानिफ करीम सय्यद) बहादुरभाई यांच्याच गळ्यात टाकली असुन पुन्हा काँग्रेस शहरात अधिक बळकटीने काम करेल अशी अपेक्षा काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते व्यक्त करत आहेत. यावेळी जेष्ठ नेते प्रकाशराव देशमुख,अँड. शशीशेखर चौधरी, एहेतेशाम खतीब, सुभाष राव देशमुख, दीपक सिरसाट, बदर भाई, रसुल खान, व फरकुद आली बेग अदी नेते पदाधिकारी उपस्थित होते.

# यशवंत हॉस्पिटल आणि एम.जे.सोनोग्राफी सेंटरचा भव्य शुभारंभ




आष्टी (प्रतिनिधी)

रविवार दि. ६ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वा. यशवंत हॉस्पिटल आणि एम. जे. सोनोग्राफी सेंटर, आष्टी चा भव्य शुभारंभ करण्याचे योजिले आहे. उद्घाटक म्हणून आ. सुरेश आण्णा धस हे उपस्थित राहणार आहेत. तर विशेष उपस्थिती मा. आ. बाळासाहेब काका आजबे, मा. आ. भीमरावजी धोंडे साहेब, मा. आ. साहेबरावजी दरेकर नाना, आष्टी चे तहसिलदार श्रीमती वैशाली पाटील, आष्टी चे पोलीस निरिक्षक शरद भुतेकर यांची राहणार आहे. तसेच यावेळी प्रमुख उपस्थिती मा. जि. प. सदस्य देविदास आबा धस, मा. जि. प. सदस्य अमरराजे निंबाळकर, नगराध्यक्ष जियाभाई बेग, राष्ट्रवादी कॉ. आष्टी तालुकाध्यक्ष आण्णासाहेब चौधरी, सरपंच मुर्शदपूर - कासाची अशोक मुळे, मा. जि. प. अध्यक्ष बीड डॉ. शिवाजी राऊत, अध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँ. सतिष आबा शिंदे, मा. सभापती पं. स. आष्टी बद्रीनाथ जगताप, उपनगराध्यक्ष न. प. आष्टी शैलेश सहस्त्रबुध्दे, मा. नगराध्यक्ष आष्टी, रंगनाथ धोंडे, सर्व डॉक्टर्स आसोसिएशन आष्टी, सर्व केमिस्ट असोसिएशन आष्टी, सर्व लॅब असोसिएशन आष्टी,

## आजी - माजी आमदारांची विशेष उपस्थिती

सर्व पत्रकार आणि असो. आष्टी यांची असणार आहे. तरी यशवंत हॉस्पिटल अँण्ड एम. जे. सोनोग्राफी सेंटर, अहिल्यादेवी भारतगॅस एजन्सी शेजारी, खडकत रोड, आष्टी, ता. आष्टी, जि. बीड या ठिकाणी होणाऱ्या शुभारंभ कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सौ. विजया व मनोहर जानबा पवार (मा. सरपंच कुसळंब), सौ. प्रा. सविता व प्रा. अशोक मनोहर पवार (प्राध्यापक ज. जू. कॉलेज धानोरा), डॉ. चारुदत्त पवार, डॉ. राणी भोसले - पवार, स्त्रीरोग तज्ञ व सोनोलॉजिस्ट डॉ. वर्षा शिवाजी राऊत, संदिप धस (स्वरा मेडिकल), भाऊसाहेब पवार (संचालक एम. जे. सोनोग्राफी सेंटर), भागवत पवार सर, सोपान येवले यांनी केले

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सोनीजवळा शाळेच्या विद्यार्थ्यांनी पटकावले पाच गोल्ड मेडल आणि पाच सिल्व्हर मेडल




केज/प्रतिनिधी

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सोनीजवळा,शाळेतील इयत्ता दुसरी ते सहावी च्या एकूण २५ विद्यार्थ्यांनी एमटीएस आलंपियाड - २०२५ या राज्यस्तरीय परीक्षेत यावर्षी प्रथमच सहभाग घेतला होता.यापैकी पाच विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल तर पाच विद्यार्थ्यांनी सिल्व्हर मेडल मिळवून उत्तुंग यश प्राप्त केले आहे . तसेच उर्वरित पंधरा विद्यार्थीही उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत.या पदकविजेत्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ दि.४ जुन रोजी शाळेत आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.हनुमंत गायकवाड आणि प्रमुख अतिथी म्हणूनसमितीचे उपाध्यक्ष श्री.प्रवीण मस्के तसेच पीएसआय कु.स्वरूपा नाईकवाडे, दैनिकसामनाचे पत्रकार श्री.सुंदरराव नाईकवाडे यांनी स्थान भूषविले. कार्यक्रमास सर्व शिक्षक विद्यार्थी,गावातील नागरिक आणि विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येनेउपस्थित होते.प्रथम अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सावित्रीबाईं फुले यांच्या प्रतिमेचे पूजनकरण्यात आले.यानंतर मुख्याध्यापक श्री.गुंड सर यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले.अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना पाच गोल्ड मेडल आणि पाच सिल्व्हर मेडल सन्मान पूर्वक प्रदान करण्यात आले.तसेच परीक्षेत सहभागी विद्यार्थ्यांना उत्तीर्ण प्रमाणपत्र वितरत करण्यात आले विशेष म्हणजे यावेळी गुणवंत विद्यार्थ्यां बरोबरच त्यांच्या पालकांचाही शाल आणि पुष्प देऊन सन्मान करण्यात आला कार्यक्रमात पीएसआय कु.स्वरूपा नाईकवाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना पेन आणि चॉकलेट भेट स्वरूपात दिले.कार्यक्रमाचे सूत्र संचलन श्री.सावंत सर यांनी तर आभार प्रदर्शन श्रीमती पवार मॅडम यांनी केले.तर कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी श्रीमती नवले मॅडम,गिरी मॅडम,श्री. काळे सर,सांगळे सर, दौंड सर आणि जावळे सर यांनी परिश्रमघेतले. विद्यार्थ्यांच्या या यशाचे सरपंच सौ.जान्हवीताई गोविंद ससाने,उप सरपंच स्वातीताई दादासाहेब कोकाटे, व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष आणि पत्रकार श्री.दशरथ चौरे यांनी कौतुक केले आहे.

# आ. सुरेश धस व आष्टी तालुका युवा पत्रकार संघ यांची मुंबई मध्ये ग्रेट भेट

## विविध विषयावर झाली चाय पे चर्चा



आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुका युवा पत्रकार संघ आणि लोकाभिमुख नेतृत्व आ. सुरेश आण्णा धस यांच्या सोबत दिनांक २ जुलै २०२५ रोजी आमदार निवास येथील वातानुलीक उपहार गृहात भेट झाली. आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे सर्व पत्रकार बांधव अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद आयोजित पत्रकारिता सन्मान सोहळा, पत्रकार भवन, आझाद मैदान, मुंबई येथील कार्यक्रमाला उपस्थित होते. आष्टी तालुका युवा पत्रकार संघ व संघाचे सर्व सदस्य मुंबई येथे आलेले समजताच पावसाळी अधिवेशनास उपस्थित असलेले कर्तव्यदक्ष आ. सुरेश आण्णा धस हे दिवसभराचे अधिवेशनाचे कामकाज आटोपून सायंकाळी ८ वाजता आमदार निवास येथील वातानुलीकीत उपहार गृहात भेटीसाठी आवर्जून उपस्थित झाले. विशेष म्हणजे त्यांनी स्वतःहून युवा पत्रकार संघाला दुपारीच फोन संदेशाद्वारे भेटीचे आमंत्रण दिलेले होते. सदरील भेटीमध्ये हसत - खेळत अनेक विषयावर सुमारे तासभर चाय पे चर्चा करण्यात आली. यावेळी आ. सुरेश धस यांनी सर्व युवा पत्रकार संघाच्या सदस्यांची आस्तेवाईकपणे चौकशी करुन सर्वांशी मनमुराद व दिलखुलासपणे संवाद साधला. शेवटी सुरुची भोजन करुन जावे अशीही विनंती केली.

वास्तविक पाहिले तर घार हिंडे आकाशी, चित्त तिचे पिल्लांपाशी या उक्तीप्रमाणे आष्टी, पाटोदा व शिरुर या मतदार संघातील कोणताही व्यक्ती मुंबई येथे आलेला समजतात त्याची भेट घेणे हे त्यांच्या मुळात स्वभावातच आहे याची प्रचिती पुन्हा एकदा युवा पत्रकार संघाला पहावयास मिळाली. आजही पाहिले तर तोच रुबाब, तिच गर्दी, तोच कामाचा आवाका पहावयास आवर्जून मिळाला. यामुळेच तर त्यांना खऱ्याअर्थाने लोकाभिमुख, लोकनेता, कामाचा माणूस अशी जनता म्हणते हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. आ. सुरेश आण्णा धस यांच्या सोबतच्या ग्रेट भेटीसाठी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, जेष्ठ पत्रकार गहिनीनाथ पाचबैल, जेष्ठ पत्रकार राजेंद्र लाड, पत्रकार समीर शेख, अक्षय विधाते, प्रेम पवळ, सोपान पगारे, बाळु राऊत, जुबेर सय्यद, स्विय सहाय्यक प्रतीक काळे, सुशिल ढोले हे उपस्थित होते.

# राहुल जाधव यांची पाटोदा तालुका राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी फेर निवडी



पाटोदा (प्रतिनिधी)

महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या आदेशानुसार पाटोदा तालुका राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी निवड काग्रेसच्या ,माजी मंत्री अशोकराव पाटील, आदित्य पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केज येथील पक्षाच्या बैठकीत निवड करुन नियुक्ती पत्र दिले आहे. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटी चे अध्यक्ष आदरणीय मलिकार्जुन खर्गे , देशाच्या नेत्या आदरणीय सोनियाजी गांधी, देशाचे विरोधी पक्ष नेते आदरणीय श्री. राहुलजी गांधी, अखिल भारतीय कॉंग्रेस कार्यसमितीच्या सदस्या तथा हिमाचल प्रदेश प्रभारी आदरणीय खासदार सौ. रजनीताई पाटील, महाराष्टाचे प्रभारी श्री. रमेश चेन्नीथलाजी, बीड जिल्हा प्रभारी मा. श्री. देविदासजी भन्साळी, हे विद्यामान भाजप सरकारच्या जातीय व धार्मिक तेड निर्माण करणाऱ्या धोरणावर तसेच सर्व सामान्य जनतेला भेडवसावण्याऱ्या महागाई आणि भ्रष्टाचार या सारख्या गंभीर विषयावर जागरुकता निर्माण करण्यासाठी व धर्मनिरपेक्ष आणि सर्व समावेशक विकास देणारे काँग्रेस सरकार राज्यत व देशात आणण्यासाठी काँग्रेसच्या मार्फत पक्षाला बळकटी देण्यासाठी . भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे व सर्वांचे लाडके नेते अखिल भारतीय काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष आदरणीय मल्लीकार्जुन खर्गे , देशाच्या नेत्या आदरणीय सोनियाजी गांधी, व आपले सर्वाचे लाडके नेते देशाचे विरोधी पक्ष नेते आदरणीय श्री. खासदार राहुलजी गांधी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा.हर्षवर्धन सपकाळ साहेब, अखिल भारतीय काँग्रेस कार्यसमितीच्या सदस्या तथा हिमाचल प्रदेश प्रभारी आदरणीय खासदार सौ. रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकरावजी पाटील साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसला सर्वसामान्यांना हाक्काचे व्यासपिठ निर्माण करण्यासाठी पाटोदा तालुका राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्ष पदी पाटोदा येथील राहुल शाहुराव जाधव यांची फेर निवड करण्यात आली.

# नैसर्गिक शेतीला कौशल्याची जोड गरजेची-डॉ.बाबासाहेब ठोंबरे

## कृषि सप्ताह अंतर्गत शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम




केज/प्रतिनिधी

रसायनांच्या अतिरिक्त वापरांमुळे जमिनीचा पोत असंतुलित झाला आहे.शेतकऱ्यांना तंत्रज्ञान संवादातून सक्रिय करावे लागणार आहे.नैसर्गिक शेती अभियानात पशु पालकांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.जेणे करून,निविष्ठावरील खर्च कमी होईल. शेतकरी पशुपालकांनी उत्पन्न वाढीसाठी नैसर्गिक शेतीला तंत्रज्ञान आधारित कौशल्याची जोड देणे गरजेचे आहे असे मत अध्यक्षीय समालोचनात कृषि महाविद्यालय लातूरचे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांनी जवळबन ता. केज येथे दि.०३ जुलै गुरूवार रोजी कै. भानुदासराव करपे यांच्या सहावे पुण्यस्मरणा निमित्त आयोजित भव्य शेतकरी मेळावा व व्याख्यान कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून वनश्री पुरस्कार प्राप्त सुधाकर देशमुख, विजय पवार व इरफान शेख यांची उपस्थिती होती.डॉ.ठोंबरे पुढे असे म्हणाले की,वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात शेतकरी देवो भव ! हा विचार आहे.मनुष्य-शेती- पशुधन हे निसर्गचक्र असून ते सकारात्मक व योग्य दिशेने गतीमान असणे आवश्यक आहे. शेतीमध्ये प्रगती साधण्यासाठी गटशेती ही काळाची गरज आहे. गटशेती ही शाश्वत शेतीचा प्रभावी पर्याय ठरू शकते.यामुळे मजुर टंचाईचा प्रश्न कमी होऊन उत्पादन खर्च घटून शेतीचे निव्वळ उत्पन्न वाढते. यावेळी सुधाकर देशमुख यांनी निसर्गा कडे चला हा नारा देऊन वृक्ष लागवडीचे महत्व विशद केले.त्यांनी एक पेड माँ के नाम या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले व वृक्ष संवर्धनाचे गीत गावुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.इरफान शेख यांनी सेंद्रीय शेतीच्या प्रमाणीकरणा बाबत सखोलमार्गदर्शन करून सेंद्रीय पद्धतीने उत्पादित केलेल्या मालांचे शुद्धतेसंदर्भात महत्व पटवून दिले. विजय पवार यांनी त्यांच्या भाषणात सेंद्रीय कर्बाचे महत्व सांगून शेतीत शाश्वतता आणण्यासाठी नैसर्गिक शेती अभियान आवश्यक असल्याचे संबोधले.त्यांनी पिकांचे अवशेष जमिनीत गाढून कुजवल्यामुळेजमिनीचा पोत सुधारतो याबाबत इतंभुत तांत्रिक माहिती दिली.कार्यक्रमाच्या सुरूवातीस नारळांच्या रोपांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमाचेसुत्रसंचालन ड.दिलीप करपे यांनी केले तर प्रकाश करपे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी चंद्रकांत करपे, राजेभाऊ करपे, अभयसिंह करपे, भिमराव करपे,नरहरी करपे व जनक करपे यांनी विशेष परिश्रम घेतले.या शेतकरी मेळाव्यास पंचक्रोशी तीलशेतकरी-पशुपालक

# बीड जिल्ह्यात काँग्रेस कडून नविन तालुका अध्यक्षांच्या निवडी जाहीर

## ,जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनाही प्रभारी वरून कायम अध्यक्ष केले,आगामी निवडणुकीत काँग्रेस ताकतीने लढण्याचा निर्धार

केज/प्रतिनिधी

बीड जिल्हा काँग्रेसच्या वतीने सर्वच तालुका अध्यक्षांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असून बीड जिल्हा काँग्रेसने आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून तयारी सुरू केली असल्याचे यावेळी सांगितले.या नियुक्त्या काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा.रजनीताई पाटील यांच्या सूचनेवरून व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री अशोक पाटील,आदित्य पाटील, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे, पशुपतीनाथ दांगट, प्रवीणकुमार शेप,गणेश राऊत आदींच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले.

केज तालुका अध्यक्ष पदी श्री.प्रविण लक्ष्मण खोडसे,बीडग्रामीण श्री. गणेश आसाराम बजगुडे,परळी वैजनाथ ग्रामीण,अड.प्रकाश बापूराव मुंडे,परळी वैजनाथ शहर,श्री. हानिफ करीम सय्यद, अंबेजोगाई ग्रामीण

श्री.अभिजीत व्यंकटराव लोमटे,आष्टी श्री.फारोक मोहम्मद सय्यद,पाटोदा श्री. राहुल शाहुराव जाधव, माजलगांवश्री.नारायण लक्ष्मण होके पाटील, धारूर श्री.सिध्देश्वर देवराव रणदिवे,गेवराई श्री.महेश गणेश बेद्रे, अंबाजोगाई शहर श्री. मोहमद असिफोद्दीन सइदोद्दीन खतीब बीड शहर श्री.परवेज अहमद बशिरोद्दीन कुरेशी, शिरूर कासार भास्कर बुवासाहेब केदार, माजलगाव शहर अफरोज मुसा तांबोळी, वडवणी ज्ञानेश्वर आबासाहेब आंधळे या प्रमाणे निवडी जाहीर करून नियुक्तीपत्र देण्यात आले.राज्यात काही दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याने आता प्रत्येक पक्ष बांधणी करत असल्याचे दिसत आहे. काँग्रेसने देखील बीड जिल्ह्यात सर्वच तालुका अध्यक्षांच्या व काही ठिकाणी शहर अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा.सौ.रजनीताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणारा प्रत्येक कार्यकर्ता हा एकनिष्ठ व पक्षाच्या विचारधारेचा आहे.आमच्यावर दिलेली जबाबदारी आम्ही चोखपणे पार पाडू व काँग्रेसला जिल्ह्यात पुन्हा चांगले दिवस आणू असे मत यावेळी सर्वच तालुका अध्यक्ष यांनी बोलताना व्यक्त केले.



यावेळी माजी मंत्री अशोक पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व नव नियुक्त पदाधिकारीयांना शुभेच्छा देऊन पदाचा वापर पक्ष वाढवण्या साठी व पक्षाचीभूमिका सर्वसामान्य जनतेला समजावून सांगा.आज ही प्रत्येक गावातील मोठा वर्ग काँग्रेस विचाराचा आहे.आपण त्या लोकांशी संपर्क करा आणि संघटन वाढवा,सर्वसामान्य जनतेच्या कामाला, वेळेला उभे रहा. लोकांचा विश्वास आपल्यावर आहेआपण मोठ्या ताकतीने काम करा व आगामी नगर पालिका,नगर परिषदा, तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती मध्ये आपल्याला उतरायचं आहे त्या अनुषंगाने कामाला लागण्याच्या सूचना देखील यावेळी माजी मंत्री अशोक पाटील यांनी दिल्या.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी देखील सर्व तालुका अध्यक्षांना आप आपली मरगळ झटकून मोठ्याताकतीने येणाऱ्या निवडणुका लढवण्यासाठी कामाला लागण्याचे आदेश दिले तसेच पक्ष संघटनाच्या बाबतीत काहीही अडचण असेल तर आम्हाला कळवा. प्रत्येक कामात जिल्हाध्यक्ष तुमच्या सोबत राहील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.या कार्यक्रमाला जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रत्येकाने वृक्ष दत्तक घेऊन त्याचे संवर्धन करावे - ओमप्रकाश यादव

## यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन
## गावात लोकसहभागातून वृक्ष लागवड करण्यात आली



परभणी - बदलत्या नैसर्गिक परिस्थितीनुसार पर्यावरणाच्या संवर्धनासाठी प्रत्येकाने वृक्ष दत्तक घेऊन त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी ओमप्रकाश यादव यांनी केले.

शुक्रवार दि. ०४ जुलै २०२५ रोजी पाथरी तालुक्यातील वडी या ग्रामपंचायती मध्ये माझं गाव माझं योगदान उपक्रमांतर्गत गावकऱ्यांच्या लोकसहभागातून वृक्ष लागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गावच्या सरपंच सौ सुशीलाताई खंडागळे, उपसरपंच सिद्धेश्वर शिंदे, शालेय समिती अध्यक्ष कृष्णकुमार शिंदे, माजी सरपंच शिवाजीराव कुटे, माजी उपसरपंच प्रतापराव शिंदे, प्रा. एस एस शिंदे, सोमेश्वर शिंदे, ग्रामविकास अधिकारी, प्रभाकर खेत्री, मुख्याध्यापक संजय चिंचाणे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, शा.व्य. समिती सदस्य, सर्व शिक्षक, ग्रा.पं.कर्मचारी गोपाळ शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी गावातील प्रमुख ठिकाणी वड, पिंपळ, जांभूळ, पेरू, आंबा, अशा विविध फळझाडांची लागवड करण्यात आली. ओमप्रकाश यादव यांनी गावातील नागरिकांना फळबाग, आधुनिक शेती, तसेच शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा आणि बांधावर मोकळ्या जागेत वृक्षरोपन करुन गावकऱ्यांना वृक्ष लागवडीचा संकल्प देऊन दत्तक घेत असलेल्या वृक्षांचे संगोपन करण्या बाबत आवाहन केले. यावेळी त्यांनी पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडी या ठिकाणी भेट देऊन शाळेच्या परिसरात वृक्षारोपण केले. शाळेत काही वर्गांना भेटी देऊन अधिकारी होण्यासाठी विध्यार्थ्यांशी दिलखुलास सवांद साधला. विध्यार्थी गुणवत्ता आणि शिस्त तसेच भौतिक सुविधा, आणि शालेय परिसर पाहून समाधान व्यक्त केले.



## शक्तीपीठ महामार्ग मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना पिंगळी व शेंद्रा येथील शेतकऱ्यांनी मोजणी न करताच परत पाठवले

परभणी - शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनासाठी शेतजमीन मोजण्याकरिता आज दि.४ जुलै रोजी परभणी तालुक्यातील शेंद्रा व पिंगळी येथील शेतकऱ्यांनी मोजणी न करू देताच परत पाठवले.

यावेळी शेतकऱ्यांनी प्रचंड घोषणाबाजी करत जमीन मोजणीसाठी आलेले अधिकाऱ्यांना आम्ही आमच्या सुपीक जमिनी कुठल्याही परिस्थितीत शक्तिपीठ महामार्गासाठी देणार नाहीत असा लेखी पंचनामा करून शासनाकडे पाठविण्यासाठी भाग पाडले.

परभणी जिल्ह्यातील पूर्णा परभणी व सोनपेठ तालुक्यातून एकूण ७१ किलोमीटरचा शक्तिपीठ महामार्ग जाणार आहे. या महामार्गामध्ये शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर सुपीक जमिनी जाणार असून भूसंपादनासाठी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर विरोध आहे या आधी पूर्णा तालुक्यातील सुरवाडी आणि सोनपेठ तालुक्यातील कानेगाव येथील शेतकऱ्यांनी जमीन मोजनीला विरोध करत मोजणी करण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना परत पाठवले होते.

दिनांक ०१ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्रात बारा ठिकाणी तर चार ठिकाणी शेतकऱ्यांनी रास्ता रोको करून शक्तिपीठ महामार्गाला मोठ्या प्रमाणावर विरोध केला आहे. शेतकऱ्यांच्या या आंदोलनाला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष किशोर ढगे, प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधने, कॉम्रेड माधुरीताई क्षीरसागर, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अमोल जाधव यांच्यासह अनेक शेतकरी संघटनांनी पाठिंबा देत सक्रिय सहभाग नोंदविला होता तसेच या रास्ता रोको आंदोलनामध्ये वरील सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला होता.

## खात्यांना होल्ड नको, कर्ज तात्काळ मंजूर करा– सोमूरकर

देगलूर। प्रतिनिधी

शेतकरी अडचणीत असताना बँकांनी पिककर्ज मंजुरीसाठी आडवे येऊ नये, अन्यथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) 'बँकांची शाळा' आंदोलन राबवणार, असा इशारा नेते भागवत पाटील सोमूरकर यांनी दिला आहे.

सध्या हमीभावाचा अभाव, नैसर्गिक आपत्ती आणि विमा कंपन्यांच्या अकार्यक्षमतेमुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. अशा कठीण परिस्थितीत शासनाने पिककर्ज मंजुरीसाठी स्पष्ट आदेश दिले असतानाही महाराष्ट्र ग्रामीण बँक, हणेगाव येथे शेकडो अर्ज प्रलंबित ठेवले जात आहेत. काही अर्ज मुख्य शाखा वा विभागीय कार्यालयाकडे पाठवून शेतकऱ्यांना नाहक त्रास दिला जात असल्याची तक्रार आहे.

तांत्रिक कारणांची आडवळणं स्वीकारार्ह नाहीत

कर्ज नाकारताना सिबिल, थकबाकी, विविध तांत्रिक अडचणींचे कारण पुढे केले जात आहे. मात्र, शेतकऱ्यांना अशा प्रकारे डावलणे हे अन्यायकारक आहे. पीककर्ज विना अट व विना विलंब मंजूर करावे, खात्यांवर कोणत्याही प्रकारचा



'होल्ड' लावू नये, अशी ठाम मागणी सोमूरकर यांनी केली आहे.

तीव्र आंदोलनाची चेतावणी

शेतकऱ्यांचे कर्ज थांबवले तर युवासेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आम्ही रस्त्यावर उतरू. बँकांनी शेतकऱ्यांच्या भावनांचा विचार करावा अन्यथा परिणाम भोगावे लागतील, असेही सोमूरकर म्हणाले.शेतकऱ्यांचा प्रश्न केंद्रस्थानी ठेवत शिवसेनेने आता आक्रमक भूमिका घेतली असून, बँक व्यवस्थापनाची कसोटी लागणार हे निश्चित.

## जुनी पेन्शन व शंभर टक्के अनुदान यासाठी १० जुलै रोजी संपूर्ण मराठवाड्यात होणार धरणे आंदोलन

मराठवाडा शिक्षक संघाचा एल्गार

परभणी: सर्वांनाच जुनी पेन्शन लागू करावी व राज्यातील निकषपात्र विनाअनुदानित शाळा, वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार अनुदान द्यावे, राज्यातील खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवासंरक्षण व यथानियम वेतन देण्यात यावे या व इतर मागण्यांच्या पुर्ततेसाठी मराठवाडा विभागातील सर्व शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर १० जुलै रोजी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव आणि सरचिटणीस राजकुमार कदम यांनी मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांना पाठविण्यात आले आहे.

या बाबत मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, कोणत्याही देशाची प्रगती त्या देशातील शिक्षण आणि शिक्षक व शिक्षणाशी संबधीत घटकांची स्थिती यावर अवलंबून असते. ज्या देशांनी शिक्षणास सर्वोच्च प्रधान्य दिले ते देश जगात महासत्ता म्हणून मानाने मिरवत आहेत. स्वातंत्र्योत्तर भारतीय राज्यकर्त्यांनी शिक्षणास तेवढे महत्व दिले नाही. महान शैक्षणिक परंपरा असलेले महाराष्ट्र राज्य देखील त्यास अपवाद नाही.

राज्य सरकारच्या धरसोडीच्या व नकारात्मक शैक्षणिक धोरणांमुळे राज्यातील शालेय शिक्षण विभाग प्रश्नग्रस्त बनला आहे. राज्यकर्त्यांनी स्वत:साठी आकर्षक पेन्शन योजना लागू करून घेतलेली असताना शिक्षक शिक्षकेत्तरांना अतिशय कुचकामी अशी अंशदायी पेन्शनयोजना लागू केली आहे. गेल्या पाव शतकापासून राज्यातील हजारो शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विनावेतन किंवा अल्प वेतनावर काम करित आहेत. ही खेदाची बाब आहे. शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व शिक्षणाशी संबंधीत इतर घटकांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामुळे या सर्व घटकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. तो व्यक्त करण्यासाठी आणि खालील मागण्यांच्या पुर्ततेसाठी दि. १०/०७/२०२५ रोजी गुरुवारी सायं. ०४ ते ०६ या वेळेत मराठवाडा विभागातील सर्व शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने लक्षवेधी धरणे आंदोलन आयोजित केले आहे. या आंदोलना मागच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे १) अंशदायी पेन्शन योजना रद्द करून सर्वांनाच जुनी पेन्शन योजना लागू करावी. ०१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त परंतु नंतर १००% अनुदानावर आलेल्या शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना इतर राज्य सरकारी कर्मचाऱ्या प्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करण्याची कार्यवाही ताबडतोब करावी.

वरिल मागण्यांच्या पुर्ततेसाठी १० जुलै रोजी आयोजित आंदोलनाची उचित नोंद घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावेत व अप्रिय घटना टाळाव्यात ही विनंती मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव आणि सरचिटणीस राजकुमार कदम परभणी जिल्हाध्यक्ष यशवंत मकरंद,सचिव निशांत हाके,महिला आघाडी अध्यक्ष दुर्गा देशमुख यांच्यासह विक्रम कदम,बी.टी.सांगळे,संतोष साखरे,अमित मोगल,दादाराव गिराम सेलु तालुकाध्यक्ष संतोष मळसटवाड,विजय धापसे पुर्णा तालुकाध्यक्ष रमेश सुर्यवंशी,शिवसांब महाजन यांनी केली आहे.



**लोकनेते सुरेश (आण्णा) धस यांच्या मार्गदर्शनाखाली व पाटोदा नगरपंचायत च्या माध्यमातून पाटोदा शहरामध्ये तालुक्यातून येणारे नागरिकांना पोलीस प्रशासनाकडून गाडीवरती दंड करण्यात येत आहे अनेक व्यापारी, डॉक्टर , शेतकरी व शहरातल्या, नागरिकांनी यासंदर्भात आपण लक्ष घालून हा प्रश्न मार्गी लावा असं सांगितलं होतं या संदर्भात मी पोलीस प्रश्नाला पत्र दिल यासंदर्भात आज पाटोदा बीटा अमलदार श्री रवींद्रजी उबाळे साहेब यांनी माझी भेट घेतली याप्रसंगी श्री उबाळे साहेब यांनी काही भागांमध्ये दंड आकारण्यात येणार नाही हॉस्पिटल मेडिकल पोस्ट ऑफिस कृषी सेवा केंद्र किराणा दुकान आडत इत्यादी ठिकाणी दंडा खाण्यात येणार नाही असे मला आश्वासन दिल या प्रसंगी मी पाटोदा नगरपंचायत च्या वतीने त्यांचा सन्मान व स्वागत केलं नागरिकांना देखील नम्र विनंती आहे की आपली गाडी पार्किंग करत असताना पांढऱ्या पट्ट्याच्या अलीकडे लावावी व सहकार्य करावे:– नगराध्यक्ष राजु भैय्या जाधव**

## बांधकाम विभागाचा कारभार 'ऑन पेपर'च! पाच तालुके नांदेडच्य फेर्या करत हैराण!

देगलूर । प्रतिनिधी

देगलूर येथील जिल्हा परिषद बांधकाम विभागात १८ अधिकाऱ्यांची नेमणूक असतानाही कार्यालयात केवळ दोनच कर्मचारी हजेरी लावत असून, संपूर्ण कारभार नांदेडहूनच सुरू आहे. त्यामुळे देगलूर, नायगाव, बिलोली, मुखेड आणि धर्माबाद या पाच तालुक्यांतील नागरिकांना किरकोळ कामांसाठीही नांदेडला धाव घ्यावी लागत आहे.

कार्यकारी अभियंता विजय कांबळे हे कार्यालयात अनुपस्थित असून, उपस्थिती पटावर सह्या कशा घेतल्या जातात, याबाबतही शंका निर्माण झाली आहे. २ जुलै रोजी झालेल्या पाहणीतही कार्यालयाला कुलूप लावलेले आढळून आले.

पूर्वीचे सीईओ मीनल करनवाल यांनी आठवड्यातून दोन दिवस कार्यालयात उपस्थित



राहण्याचे आदेश दिले होते, पण तेही सध्या पाळले जात नाहीत. या कारभाराच्या विरोधात आता जनतेतून तीव्र नाराजी व्यक्त होत असून, विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## गंगा माऊली शुगरचा मिल रोलर पूजन कार्यक्रम संपन्न

केज (प्रतिनिधी)

केज शहरालगत असलेला गंगा माऊली शुगर कारखान्याचे मिल रोलर पूजन चेअरमन लक्ष्मणराव मोरे,युवा नेते आदित्य पाटील, व्हाईस चेअरमन हनुमंत मोरे,भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे,गंगा माऊली शुगरचे संचालक प्रवीण मोरे, संचालक अविनाश मोरे,काँग्रेसचे युवा नेते पशुपतीनाथ दांगट, आप्पासाहेब ईखे, प्रविणकुमार शेप, बाळासाहेब ठोंबरे,मुन्ना ठोंबरे,कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी.आय. मुजावर,मुख्य शेतकी अधिकारी अविनाश आदनाक आदींच्याहस्ते रोलर



पूजन झाले. पुढील हंगाम गाळपा साठी पूजन कार्यक्रम घेऊन सुरुवात करण्यात आली.पुढील हंगामात साखर कारखाना गाळपाचा अधिकचा टप्पा पूर्ण करेल असे मत आदित्य पाटील यांनी बोलतांना व्यक्त केले.ऊस उत्पादक शेतकऱ्यांना विश्वास आणि हमीभाव याबाबाबत आम्ही शब्दबद्ध आहोत. कॅपिसिटी वाढवण्या साठी गतीने प्रयत्न सुरू आहेत असे मत हनुमंत काका मोरे यांनी व्यक्त केले.रोलर पूजन कार्यक्रमास परिसरा तील नागरिक,

## वृक्षमित्र मा.श्री.रंगनाथ आण्णा धोंडे - राजेंद्र लाड
## धनश्री नव्हे वनश्री असे आदर्श व्यक्तीमत्व

आष्टी (प्रतिनिधी)

आपल्या वाढदिवसानिमित्त कोणी काय, कोणी काय, उपक्रम साजरे करतात. कोणी हजारो रुपये खर्च करुन मौजमजा करतात, मात्र आष्टीचे माजी नगराध्यक्ष श्री. रंगनाथ आण्णा धोंडे यांनी गेल्या सात वर्षापासून आष्टी शहरात हजारो झाडे लावले व जगवले. उन्हाळ्यात त्या झाडांना स्वखर्चातून पाणी घातले. ती झाडे जगवली, आता त्या झाडांसोबतच आपला वाढदिवस साजरा करतात. स्वतः च्या वाढदिवसापेक्षा झाडांचा वाढदिवस साजरा करणारे हे वृक्षमित्र आहेत. धनश्री पतसंस्थेने आष्टी पाठोपाठ कडा व अनेक परिसरात वृक्षारोपण केलेले आहे. तसेच वृक्षमित्र श्री. रंगनाथ आण्णा धोंडे यांचे सामाजिक कार्य पण कौतुकास्पद आहे. आष्टी शहरातील धनश्री पतसंस्था गेल्या सात वर्षापासून १ जुलै रोजी वृक्षलागवड करते. गेल्या सात वर्षात जवळपास हजारोंच्या वरती झाडे लावून त्यांचे संगोपनही केलेले आहे. यावर्षी सुद्धा आज १ जूलै २०२५ रोजी धनश्री पतसंस्थेचे चेअरमन श्री. रंगनाथ आण्णा धोंडे हे आपल्या ६२ व्या. वाढदिवसाच्यानिमित्ताने मुर्शदपूर भागात झाडे लावणार आहेत. वृक्षारोपणासाठी धनश्री पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन एल. जी. सुरतवाले, पतसंस्थेचे कार्यकारी संचालक जितेंद्र शिंदे, रमेश बोराडे, शांतीलाल धोंडे हे परिश्रम घेत आहेत.

ग्रामपंचायत सदस्य, आष्टी पंचायत समिती सदस्य ते नगरपंचायत निवडणुकीमध्ये आजपर्यंत कधीच पराभव झालेला नाही. गावातील लोकांच्या गरजा भागवण्याला नेहमीच प्राधान्य दिल्यामुळे, गावातील सर्व जातीधर्माचे लोक तसेच गोरगरीब जनता सगळे अडचण आली की, केंव्हाही हक्काने फोन करतात आणि आण्णा त्यांच्या मदतीला धावतात. आज धनश्री पतसंस्थेच्या माध्यमातून देखील एकप्रकारे जनतेची ते सेवाच करतात. धनश्री पतसंस्था उत्कृष्ट कार्याबद्दल महाराष्ट्रात गौरविलेली आहे. श्री. रंगनाथ धोंडे यांचे सामाजिक, राजकीय, धार्मिक, व्यापार, बँकींग क्षेत्रात असामान्य काम आहे. वृक्षमित्र श्री. रंगनाथ धोंडे यांचे झाडांवर नितांत प्रेम आहे. सात वर्षापूर्वी वृक्षारोपण हे सुरू केलेलं काम आज यशस्वीरित्या पार पडलं आहे. पोटच्या मुलांपेक्षा झाडांवर प्रेम करणारा हा वृक्षमित्र आहे. झाडाची फांदी तोडली तर हळहळ करणारे ते एकमेव सामाजिक कार्यकर्ते आहेत. राजकीय प्रवासात सरपंच, उपसरपंच, उपसभापती, आणि नगराध्यक्ष या सगळ्या यशस्वी कारकिर्दीतील यशामध्ये किंवा ज्यांच्यामुळे हे अलौकिक सामाजिक, राजकीय कार्य करता आले ते म्हणजे श्री. रंगनाथ आण्णा धोंडे यांचे मार्गदर्शक नेतृत्व आ. सुरेश आण्णा धस यांच्या मदतीने हे शक्य झाले अशी भावना श्री. रंगनाथ धोंडे यांची नक्कीच आहे. धस आण्णांनी नेहमीच श्री. रंगनाथ धोंडे यांच्या कार्यकर्तृत्वाला न्याय दिला आहे.

अगदी लहानपणापासूनच संघर्षाची बीजे नसा - नसात पेरलेल्या आणि त्याच्यात नाविन्य न राहता तो एक जीवनाचा भाग बनून सदैव त्याची सवय लागते. तरीही अत्यंत बेधडकपणे कार्य करत प्रतिकूल परिस्थितीतून चिखलाच्या दलदलीतून सुंदर कमळ पुष्प निर्माण करण्याची क्रांतिकारी



किमया आष्टी शहरातील जिगरबाज राजकीय व्यक्तिमत्व श्री. रंगनाथ आण्णा धोंडे यांनी यशस्वी करून दाखवली आहे. श्री. रंगनाथ गोपीनाथ धोंडे यांचा जन्म दि. १ जुलै १९६३ मध्ये गरीब शेतकरी कुटुंबात झाला. प्राथमिक व शालेय शिक्षण आष्टी येथील जि. प. माध्यमिक मुलांची शाळा येथे झाले. आष्टीतच बी. ए. पर्यंतचे शिक्षण झाले. घरात अठराविश्व दारिद्र्य, अशा बिकट परिस्थितीतही आनंदी जीवन जगणे, शाळेला दांडी मारणे, तासन तास विहिरीत पोहणे, लहानपणी दुसऱ्यांच्या झाडाचे आंबे, सिताफळ, रामफळ, लिंब, चिंचा तोडण्यापासून होळीसाठी लाकडं गोळा करणे हा आवडीचा छंद. शृंगेरीदेवीची यात्रा असो किंवा नान्नजजवळा, फक्राबादची यात्रा असो पायी जात या यात्रेचा आनंद लुटत असत. दहावीपर्यंतचे शिक्षण झाल्यावर कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. कॉलेजमध्ये अकरावीला असतानाच कॉलेजचे विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून निवडून आले. घरात ५ भाऊ, सहावी बहीण असा परिवार, ४ चुलते, २० चुलत भाऊ, १२ चुलत बहिणी असा आष्टीतील सगळ्यात मोठा धोंडे परिवार आहे.आ. सुरेश आण्णा धस यांच्या सर्व राजकीय, आर्थिक व्यवहारांमध्ये महत्त्वाची निष्ठेने भूमिका बजावणारे श्री. रंगनाथ आण्णा धोंडे आहेत. अनेक वेळा राजकारणात त्यांच्या प्रखर निष्ठेला, सचोटीला, कष्टाला आ. सुरेश आण्णा धस यांच्याकडून न्याय मिळालेला आहे. आज त्यांचा ६२ वा वाढदिवस आहे त्यानिमित्ताने त्यांना राजेंद्र लाड परिवाराकडून व दै. समर्थ राजयोग परिवाराकडूनही वाढदिवसाच्या मनस्वी शुभेच्छा.